दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार
ज्येष्ठा गौरी आवाहन
संपादक (विकास) : श्याम पेठकर
संचालक-संपादक : अजय बिवडे
Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : गुरूवार, १७ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २७८ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

थोडक्यात

## ओरॅकलने हजारो कर्मचाऱ्यांना कामावरून काढले

**नवी दिल्ली :** आजचा दिवस ओरॅकलमधील हजारो कर्मचाऱ्यांसाठी अखेरचा ठरला. सकाळी ४ वाजता कर्मचाऱ्यांचा अक्सेस बंद करण्यात आला, तर ६ वाजता त्यांना ई-मेल करून तुमचा आजचा अखेरचा दिवस आहे असे सांगून ओरॅकल कंपनीने अमेरिकेत हजारो कर्मचाऱ्यांना कामावरून तडकाफडकी काढून टाकले आहे. कंपनीने जगभरात कर्मचारी कपात सुरू केली असून भारतात किती कर्मचाऱ्यांची नोकरी जाईल, याबद्दल ओरॅकलने अद्याप कोणतीही अधिकृत माहिती दिली नाही.

ओरॅकल कंपनी कर्मचारी कपात करून एआय आणि क्लाऊड इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये गुंतवणूक वाढवत आहे. कंपनीने सकाळी ४ वाजता कंपनीच्या सिस्टिममध्ये कर्मचाऱ्यांचे लॉग-इन बंद केले. ५ वाजता मेसेजिंग अँप स्लॅकमधून कर्मचारी आपोआप लॉग-आऊट झाले. ऑफिसच्या गेटवरील एन्ट्री कार्डने प्रवेश देणे बंद केले. सकाळी ६ वाजता कंपनी व्यवस्थापनाकडून एक ई-मेल पाठवण्यात आला. त्यात लिहिले होते, कंपनीतील बदलामुळे तुमचे पद रद्द केले जात आहे. आज तुमचा शेवटचा दिवस आहे. कंपनीच्या या तडकाफडकी निर्णयामुळे कर्मचाऱ्यांना मोठा धक्का बसला आहे. टेक्निकल टीममधील डेटा सेंटर आणि क्लाऊडची सुरक्षा पाहणारे कर्मचारी, सॉफ्टवेअर डेव्हलपरमधील फ्यूजन, नेटसूट आणि एचआर सॉफ्टवेअर बनवणारी टीम, सेल्स व सपोर्टमधील सेल्स एक्झिक्युटिव्ह आणि ग्राहकांना मदत करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्यात आले आहे.

# नक्षलवादी हल्ल्यातील १० दोषींना फाशीची शिक्षा

**वृत्तसंस्था, जगदलपूर/रायपूर**

२०१३ मध्ये झीरम खोऱ्यात काँग्रेस नेत्यांसह २९ लोकांच्या हत्येप्रकरणी जगदलपूर एनआयए न्यायालयाने १० दोषींना फाशीची शिक्षा सुनावली आहे. २५ मे २०१३ रोजी काँग्रेसच्या परिवर्तन यात्रेच्या ताफ्यावर नक्षलवादी हल्ला झाला होता. यात काँग्रेसचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष नंदकुमार पटेल, महेंद्र कर्मा आणि माजी केंद्रीय मंत्री विद्याचरण शुक्ल यांच्यासह २९ लोकांचा मृत्यू झाला होता. सुमारे १३ वर्षे चाललेल्या सुनावणीत १०१ साक्षीदारांचे जबाब आणि कागदपत्रे नोंदवण्यात आली. ही शिक्षा उच्च न्यायालयाच्या आदेशानंतरच लागू होईल. तोपर्यंत सर्व दोषी जगदलपूरच्या केंद्रीय कारागृहात राहतील. ३० दिवसांच्या आत उच्च न्यायालयात अपील करू शकतात. अभियोजन पक्षाने फाशीची मागणी केली होती, तर बचाव पक्षाने शिक्षेत कपात करण्याची मागणी केली होती.




१३ वर्षांपूर्वी बस्तरमध्ये काँग्रेस आपली परिवर्तन यात्रा काढत होती. २५ मे २०१३ च्या संध्याकाळी ही यात्रा सुकमाच्या दिशेने परत येत होती. जेव्हा ताफा दरभा क्षेत्रातील झीरम घाटातून जात होता, तेव्हा माओवाद्यांनी दबा धरून हल्ला केला. हल्ल्याची सुरुवात आयईडी स्फोटाने झाली. त्यानंतर रस्त्यावर झाडे पाडून मार्ग बंद करण्यात आला आणि जंगलातून ताफ्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. थोड्याच वेळात संपूर्ण परिसर गोळ्यांच्या आवाजाने दणाणून गेला. नक्षलवाद्यांनी नेते आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांना वेगळे केले. माओवाद्यांचे मुख्य लक्ष्य महेंद्र कर्मा होते. नंदकुमार पटेल, त्यांचे पुत्र दिनेश पटेल आणि इतर अनेक लोकांचीही हत्या करण्यात आली. एकाच हल्ल्यात काँग्रेसची त्यावेळची राज्याची सर्वोच्च नेतृत्व फळी जवळजवळ संपली होती.

**प्राण गमावलेल्या काँग्रेस नेत्यांची नावे**

नंदकुमार पटेल (तत्कालीन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष), महेंद्र कर्मा (माजी विरोधी पक्षनेते), विद्याचरण शुक्ल (माजी केंद्रीय मंत्री), दिनेश पटेल, उदय मुदलियार, भागीरथी पालिया, राजकुमार, गोपीचंद माधवानी, अल्लानूर, योगेंद्र शर्मा, राजेश चंद्राकर, मनोज जोशी, अभिषेक गोलचा, गणपत नाग, सदा सिंह, चंद्रहास ध्रुव, दीपक उपाध्याय, तरुण देशमुख, प्रहलाद, चंदर राम मांझी, पैतृक खलखो, पवन कोंद्रा, सियाराम सिंह, पोलीस कर्मचारी- प्रधान आरक्षक प्रफुल्ल शुक्ला, अशोक कुमार, राहुल प्रताप सिंह आणि इमॅन्युअल केरकेट्टा.

**हल्ला संपल्यानंतर शस्त्रेही लुटून नेली**

नक्षलवाद्यांनी ताफ्यातील गाड्या आणि ठार झालेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांची शस्त्रेही ताब्यात घेतली होती. २५ सप्टेंबर २०१४ रोजी एनआयएच्या आरोपपत्रानुसार, हल्ल्यानंतर एक ९ एमएम पिस्तूलसह २ मॅगझिन आणि २० काडतुसे, दोन एके-४७ रायफल्स, १४ मॅगझिन आणि ४५५ काडतुसे आणि १० हँड ग्रेनेड, वॉकी टॉकी आणि इतर उपकरणे लुटली होती.

# १० बंडखोर आमदारांना अपात्रतेची नोटीस



**वृत्तसंस्था, कोलकाता**

तृणमूल काँग्रेसच्या १० बंडखोर आमदारांना पश्चिम बंगाल विधानसभा सचिवालयाने नोटीस बजावली आहे. या आमदारांना एका आठवड्याच्या आत आपले स्पष्टीकरण देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील गटाने दाखल केलेल्या अपात्रतेच्या अर्जावर उत्तर देण्यासाठी पश्चिम बंगाल विधानसभा सचिवालयाने मंगळवारी बंडखोर आमदारांना नोटीस बजावली.

तृणमूलचे ज्येष्ठ नेते सोभनदेव चॅटर्जी यांनी सोमवारी विरोधी पक्षनेते ऋतव्रत बॅनर्जी यांच्यासह १० आमदारांना अपात्र ठरवण्यासाठी थेट सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर लगेचच विधानसभेकडून या नोटिसा जारी करण्यात आल्या. त्यामुळे आता हा कायदेशीर आणि राजकीय लढा विधानसभा, उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय, संसद आणि निवडणूक आयोग अशा पाचही ठिकाणी एकाच वेळी पाहायला मिळत आहे. विधानसभा सचिवालयाने ऋतव्रत बॅनर्जी (बंडखोर गटाचे विरोधी पक्षनेते), अरूप रॉय, फिरहाद हकीम, सांदीपन साहा, अखुझमन अन्सारी, शिउली साहा, सबिना यास्मिन, बिप्लव मित्रा, जावेद खान आणि राथिन घोष या दहा बंडखोर आमदारांना नोटीस बजावली आहे. या संदर्भात बोलताना बंडखोर गटाचे आमदार अखुझमन अन्सारी यांनी नोटीस मिळाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला. आम्हाला नोटीस प्राप्त झाली असून आम्ही पक्षाच्या अंतर्गत बैठकीत चर्चा करून दिलेल्या मुदतीत योग्य ते उत्तर देऊ, असे त्यांनी स्पष्ट केले. मे महिन्यात झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर तृणमूल काँग्रेसमध्ये मोठी फूट पडली. तृणमूल काँग्रेसने सोभनदेव चॅटर्जी यांची विरोधी पक्षनेतेपदासाठी निवड केली होती. मात्र ८० पैकी ६५ आमदारांचा पाठिंबा असल्याचा दावा करत बंडखोर गटाने ऋतव्रत बॅनर्जी यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड केली. अध्यक्षांनी ऋतव्रत बॅनर्जी यांना विरोधी पक्षनेते म्हणून मान्यता दिल्याने सोभनदेव चॅटर्जी यांनी या निर्णयाविरोधात कोलकाता उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

## मक्कावरील हल्ल्याचा प्रयत्न उधळला

**अबुधाबी :** इस्लाम धर्मियांचे पवित्र स्थळ इस्लाम धर्मातील अत्यंत पवित्र स्थळ मानल्या जाणाऱ्या मक्का शहराच्या दिशेने हुथी बंडखोरांनी डागलेला एक ड्रोन सौदी आघाडीच्या सैन्याने हवेतच रोखून नष्ट केला आहे. या गंभीर घटनेमुळे पवित्र शहराच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून दोन्ही देशांमधील संघर्ष अधिक पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान, या युद्धावर पडदा पाडण्यासाठी चीनने मध्यस्थीचे प्रयत्न सुरू केले आहेत. याच पार्श्वभूमीवर इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अरागची हे चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांची भेट घेण्यासाठी बीजिंगला रवाना झाले आहेत. हुथी बंडखोरांच्या सततच्या ड्रोन हल्ल्यांनंतर सौदी अरेबियाने आपल्या यांबू बंदरावरील तेलाचे लोडिंग तूर्तास थांबवले आहे. तथापि, सौदीचा पूर्व-पश्चिम पाईपलाईन मार्ग येत्या काही दिवसांत पुन्हा पूर्ववत सुरू होईल, अशी अपेक्षा अमेरिकेचे ऊर्जा सचिव ख्रिस राइट यांनी व्यक्त केली आहे. हुथीच्या परराष्ट्र मंत्रालयाने या घडामोडींवर स्पष्टीकरण देताना म्हटले आहे की, बाब अल-मंदिब सामुद्रधुनीतील सागरी वाहतूक पूर्णपणे सुरक्षित आहे. सौदी अरेबिया या जलमार्गाबाबत आंतरराष्ट्रीय समुदायाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोपही हुथी प्रशासनाने केला आहे. दरम्यान, संयुक्त राष्ट्रांच्या निर्वासित संस्थेने दिलेल्या माहितीनुसार, येमेनच्या पश्चिम किनारपट्टीवर अचानक वाढलेल्या सशस्त्र संघर्षामुळे देशांतर्गत तब्बल १ लाखांपेक्षा जास्त नागरिक विस्थापित झाले आहेत.

## सोन्याच्या हॉलमार्किंग शुल्कात तब्बल ६७ टक्के वाढ

**नवी दिल्ली :** ऐन सणासुदीमध्ये ग्राहकांच्या खिशाला कात्री लागणार आहे. भारतीय मानक ब्यूरो अर्थात बीआयएसने सोन्याच्या दागिन्यांवरील हॉलमार्किंग शुक्लामध्ये तब्बल ६७ टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. बीआयएसने हॉलमार्किंग शुल्कात ३० रुपयांची वाढ केली असून आता प्रति दागिना ७५ रुपये शुल्क मोजावे लागणार आहे. तर दुसरीकडे चांदीच्या दागिन्यांवरील शुल्क ३५ रुपयांवर कायम ठेवण्यात आले आहे. हे नवीन तर तात्काळ लागू करण्यात आले आहेत.

बीआयएसने ह्यबीआयएस (हॉलमार्किंग) दुरुस्ती नियम, २०२६ अन्वये १४ सप्टेंबर २०२६ रोजी यासंदभार्तील अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. नव्या नियमांनुसार सोन्याचे दागिने खरेदी करणाऱ्याला प्रत्येक दागिनेमागे ७५ रुपये हॉलमार्किंग शुक्ल द्यावे लागेल. तर चांदीचे हॉलमार्किंग शुक्ल ३५ रुपये एवढे कायम ठेवण्यात आले आहे. सीजेसीचे अध्यक्ष राजेश रोकडे आणि उपाध्यक्ष अविनाश गुप्ता यांनी या दरवाढीबद्दल चिंता व्यक्त केली. देशभरात बनावट आणि बेकायदेशीर हॉलमार्किंग केंद्रांवर कारवाई सुरू असताना, अधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या सराफांवरच अतिरिक्त आर्थिक भार टाकला जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे. सोन्याचे दर आधीच जास्त असताना, हॉलमार्किंग शुल्कवाढीमुळे व्यापाऱ्यांचा खर्च आणखी वाढेल. हा खर्च दागिन्यांच्या किमतीत समाविष्ट होण्याची शक्यता असल्याने ग्राहकांवर अप्रत्यक्ष परिणाम होऊ शकतो.हॉलमार्किंग ही सोन्याच्या शुद्धतेची सरकारी खात्री असते. बीआयएस प्रमाणित दागिन्यांवर तीन प्रमुख चिन्हे असतात.

# अमेरिकेच्या टॅरिफ विधेयकामुळे भारतात महागाई वाढणार?

**वृत्तसंस्था, वॉशिंग्टन**

रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी करणा-या देशांवर तब्बल १०० टक्के आयात शुल्क लादण्याचे अमर्याद अधिकार अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना देणाऱ्या एका महत्त्वाच्या विधेयकाला अमेरिकेच्या हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हसने मतदान केले आहे. याचा थेट परिणाम भारत आणि चीनवर होणार असून या देशांवर १०० टक्के आयात शुल्क लागण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास भारतामध्ये महागाईचा आगडोंब उसळू शकतो.



लिंडसे ओ ग्रॅहॅम सँक्शनिंग रशिया अँड इराण ॲक्ट २०२६ असे नाव असलेले हे विधेयक मंगळवारी सायंकाळी अमेरिकन संसदेत २१४ विरुद्ध २११ अशा अत्यंत अल्प मताधिक्याने मंजूर झाले. दोन डेमोक्रॅटिक खासदारांनी रिपब्लिकन पक्षाच्या बाजूने मतदान केल्यामुळे हे विधेयक पुढे सरकू शकले. हे विधेयक बुधवारी अंतिम मतदानासाठी मांडले जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, हे विधेयक राज्यसभेत ७ ऑगस्ट रोजी ८६ विरुद्ध ११ अशा दणदणीत बहुमताने आधीच मंजूर झाले आहे. मात्र, प्रतिनिधीगृहात ट्रम्प यांच्या वाढत्या अधिकारांवरून लोकप्रतिनिधींमध्ये प्रचंड वाद निर्माण झाला आहे. ट्रम्प यांना टॅरिफ लादण्याचे अमर्याद आणि अनियंत्रित अधिकार दिल्यास ते मित्रदेशांवर अन्याय करू शकतात, अशी भीती सीनियर डेमोक्रॅट्सनी व्यक्त केली आहे.

यामुळे अमेरिकेतील महागाई वाढेल आणि युक्रेनला मिळणाऱ्या दीर्घकालीन पाठिंब्याला तडा जाईल, असा दावा त्यांनी केला. ट्रम्प यांनी भूतकाळात कॅनडा आणि मेक्सिकोसारख्या जवळच्या मित्रराष्ट्रांवर ज्या प्रकारे टॅरिफचा वापर केला होता, त्याचा संदर्भ देत खासदारांनी ट्रम्प यांच्या हातात ही नवीन सत्ता सोपवण्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

**विधेयकाचे काय परिणाम होणार?**

हे विधेयक रशियाकडून तेल आणि नैसर्गिक वायू खरेदी करणाऱ्या जगातील पहिल्या ५ मोठ्या आयातदार देशांवर १०० टक्क्यांपर्यंत टॅरिफ लादण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना देते.

भारत आणि चीन हे रशियन तेलाचे मोठे खरेदीदार असल्याने त्यांच्यावर थेट टांगती तलवार निर्माण झाली आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष, त्यांचे ऊर्जा व संरक्षण क्षेत्र, तसेच रशियन तेलाची गुप्तपणे वाहतूक करणा-या शॅडो फ्लीट जहाजांवर कडक निर्बंध लादून रशियाची आर्थिक नाकेबंदी करणे हा या विधेयकाचा मुख्य उद्देश आहे.

डेमोक्रॅटिक खासदार स्टेनी हॉयर यांनी मांडलेल्या दुरुस्तीनुसार या निर्बंधांच्या कक्षेत भारत, चीन, तुर्किया, अझरबैजान, हंगेरी, कझाकस्तान, किरगिझस्तान, सिंगापूर, स्लोव्हाकिया आणि संयुक्त अरब अमिराती या १० देशांचा समावेश सुचवण्यात आला आहे. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांनी अमेरिकन संसदेला हे विधेयक लवकरात लवकर कायद्यात रूपांतरित करण्याचे आवाहन केले आहे.

रशियाची आर्थिक ताकद मोडून काढण्यासाठी आणि युद्ध थांबवण्यासाठी रशियन तेलावर आधारित कमाई रोखणे आवश्यक आहे असे मत युक्रेनियन अधिकाऱ्यांनी व्यक्त केले आहे.

# इगतपुरीजवळ अपघात, चार ठार

**वृत्तसंस्था, ठाणे**

गेल्या काही दिवसांत राज्यात अपघातांच्या संख्येत वाढ झाली आहे. भरधाव वेगात असणारी वाहने, खराब रस्ते यामुळे प्रामुख्याने अपघात होत आहेत. अशातच आता मुंबई उपनगरातील जोगेश्वरी येथील एका कुटुंबावर देवदर्शनावरून परतताना काळाने घाला घातल्याची दुर्दैवी घटना ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात असलेल्या आटगाव येथे घडली आहे.



या घटनेत एकाच कुटुंबातील चार जण ठार झाले असून सहा जण जखमी झाले आहेत. त्र्यंबकेश्वर येथून देवदर्शन करून घरी परतत असताना हा अपघात झाला आहे. या घटनेत इर्टिगा या चारचाकी वाहनाचा चक्काचूर झाला आहे. ज्या वाहनाचा अपघात झाला आहे, त्या वाहनाने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वाहनाला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मूळचे गोरखपूर येथील रहिवासी असलेले जैस्वाल कुटुंबीय सध्या मुंबईतील जोगेश्वरी येथे वास्तव्यास होते. ते सर्वजण त्र्यंबकेश्वर येथे दर्शनासाठी गेले होते आणि दर्शन आटोपून परतीच्या प्रवासात असताना त्यांच्यावर काळाने घाला घातला. या भयंकर अपघातात श्रीराम जैस्वाल, आयुष जैस्वाल, लाडो जैस्वाल आणि सूरज जैस्वाल या चौघांचा मृत्यू झाला आहे. तर, सुभी जैस्वाल, शिवम जैस्वाल, हाशिक जैस्वाल, सुनीता जैस्वाल, राधिका जैस्वाल आणि सतीश जैस्वाल हे सहा जण जखमी झाले आहेत.

ब्रेक फेल होऊन स्टेअरिंग लॉक झाल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून हा अपघात झाला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. या धडकेत कारचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. तर, पोलिस या अपघाताच्या घटनेचा अधिक तपास करत असून अपघात नेमका कसा झाला? याचा शोध घेत आहेत. ऐन गणेशोत्सवात ही घटना घडल्यामुळे जैस्वाल कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

दैनिक सिंहवाणी वृत्त



संपादकीय लेखणीतून...

# महागाईचा भडका

देशात महागाईचा भडका उडाला असून अन्नपदार्थ, इंधन आणि उत्पादित वस्तूंच्या किमतीत वाढ झाल्याने घाऊक किंमत निदेर्शांकावर आधारित (डब्ल्यूपीआय) महागाईचा दर ऑगस्टमध्ये वाढून ९.९२ टक्क्यांवर पोहोचला आहे. जुलैमध्ये हा दर ९.७८ टक्के तर किरकोळ महागाई दर ४.८२ टक्के नोंदवला गेला. २०२२-२३ हे आधार वर्ष असलेल्या नव्या डब्ल्यूपीआय मालिकेतील ऑगस्टमधील महागाईचा दर हा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक दर ठरला आहे. अर्थतज्ज्ञांच्या मते, पश्चिम आशियातील संघर्ष पुन्हा तीव्र झाल्याने जागतिक ऊर्जा किमतीमध्ये अलिकडे झालेली वाढ यामुळे आगामी काळातही महागाईचा दबाव वाढत राहण्याची शक्यता आहे. उत्पादक किमतीवर आधारित महागाईचा दर ऑगस्टमध्ये ९.८१ टक्के राहिला, तर जुलैमध्ये तो ९.६ टक्के होता. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने डब्ल्यूपीआयची आकडेवारी जाहीर करताना सांगितले की, ऑगस्ट २०२६ मध्ये खनिज तेल (पेट्रोलियम उत्पादनांसह) खाद्यपदार्थ, खाद्यपदार्थ निर्मिती, मूलभूत धातूंचे उत्पादन, बिगर-अन्नपदार्थ आणि रसायने व रासायनिक उत्पादनांचे उत्पादन हे घाऊक महागाई वाढण्यामागील प्रमुख घटक ठरले. ऑगस्टमध्ये अन्न महागाईचा दर ७.०५ टक्क्यांवर पोहोचला. जुलैमध्ये तो ६.६५ टक्के होता. उत्पादित वस्तूंच्या गटातील डब्ल्यूपीआय महागाईचा दर मालिकेतील उच्चांकी पातळीवर म्हणजे ८.३७ टक्क्यांवर गेला. जुलैमध्ये हा दर ८.२९ टक्के होता.

इंधन आणि वीज गटातील घाऊक किंमत निदेर्शांकावर आधारित महागाईचा दर ऑगस्टमध्ये २२.९३ टक्के झाला. जुलैमध्ये हा दर २०.०५ टक्के होता. बार्कलेजच्या संशोधन अहवालात म्हटले आहे की, पश्चिम आशियातील संघर्ष पुन्हा तीव्र झाल्याने जागतिक ऊर्जा किमतीमध्ये झालेली अलीकडील वाढ डब्ल्यूपीआय आणि ओपीपीआयवर पुढील काळातही दबाव कायम ठेवेल. त्यामुळे आगामी महागाईच्या आकडेवारीत लक्षणीय घट होण्याची अपेक्षा धरता येणार नाही. इंडिया रेटिंग्ज अँड रिसर्चचे मुख्य अर्थतज्ज्ञ देवेंद्र पंत यांच्या मते पश्चिम आशियातील दीर्घकाळ सुरू असलेल्या संकटामुळे इंधन आणि वीज महागाईतील दोन महिन्यांची घसरण थांबली असून, संकट सुटेपर्यंत हा दर उच्च पातळीवर राहण्याची शक्यता आहे. पश्चिम आशियातील संकट अद्याप कायम असून, रशिया-युक्रेन संघर्षाप्रमाणेच या संकटाचेही निराकरण झालेले नाही. त्यामुळे नजिकच्या काळात जागतिक अनिश्चितता उच्च पातळीवर राहण्याची शक्यता आहे. त्यातच अपुरा पाऊस आणि रुपयाची कमजोरी यामुळे नजिकच्या काळात महागाई आणखी वाढू शकते. दुसऱ्या एका अंदाजानुसार सप्टेंबर २०२६ मध्ये घाऊक महागाईचा दर १०.२ टक्क्यांपर्यंत वाढू शकतो. पश्चिम आशिया संकटावर कायमस्वरूपी तोडगा निघेपर्यंत २०२६ च्या उर्वरित काळातही तो उच्च पातळीवर राहण्याची शक्यता आहे.

आयसीआरएचे मुख्य अर्थतज्ज्ञ राहुल अग्रवाल म्हणाले की, प्रतिकूल आधार परिणाम तसेच साखरेसारख्या काही खाद्यपदार्थांच्या किमतीत नेहमीपेक्षा अधिक वाढ झाल्याने सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये अन्नमहागाई आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे सणासुदीच्या काळात ग्राहकांच्या भावनांवरही परिणाम होऊ शकतो. अन्नधान्यांच्या वाढत्या दरांमुळे ऑगस्ट महिन्यात किरकोळ महागाई वाढून ४.८२ टक्के झाली. ग्राहक मूल्य निर्देशांकावर आधारित महागाईचा दर जुलैमध्ये ४.४५ टक्के होता. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने जाहीर केलेल्या किरकोळ महागाईचा निदेर्शांक आकडेवारीनुसार, ऑगस्टमधील अन्नधान्य महागाईचा दर ५.९५ टक्क्यांवर पोहोचला. जो मागील महिन्यात ५.५२ टक्के होता. रिझर्व्ह बँकेने २०२६-२७ या वर्षासाठी सीपीआय महागाई ५ टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. यात दुसऱ्या तिमाहीत ४.७ टक्के, तिसऱ्या तिमाहीत ५.९ टक्के आणि चौथ्या तिमाहीत ५.५ टक्के महागाईचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दुसरीकडे अन्नधान्य, इंधन व उत्पादित वस्तूंच्या वाढत्या किमतीमुळे ऑगस्ट महिन्यात घाऊक किमतीवर आधारित महागाईचा दर जुलैमधील ९.७८ टक्क्यांवरून वाढून ९.९२ टक्के झाला आहे. महागाईच्या भडक्यामुळे सर्वसामान्यांना किरकोळ आणि घाऊक अशा दोन्ही स्तरांवर महागाईचा दुहेरी तडाखा बसला आहे.



# पाकिस्तानचा एक 'फसवा बनाव' आणि 'नाटक'

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

पाकिस्तानच्या फेडरल इन्व्हेस्टिगेशन एजन्सीने त्यांच्या २०२६ च्या 'रेड बुक' (मोस्ट वाँटेड यादी) मध्ये मसूद अजहरचे नाव समाविष्ट करून त्याच्यावर ७० लाख पाकिस्तानी रुपयांचे इनाम जाहीर केले आहे. २०२१ मध्ये हे इनाम ५० लाख होते, त्यात आता २० लाखांची वाढ करण्यात आली आहे. मसूद अजहर पाकिस्तान मध्येच दडून बसला असताना पाकिस्तान पाकिस्तान आंतरराष्ट्रीय समुदायाच्या डोळ्यात धुळ झोपण्याचा प्रयत्न करत आहे त्याला फरार दाखवून इनाम घोषित करून पाकिस्तानने नवा देखावा निर्माण केला आहे.

जैश-ए-मोहम्मदचा प्रमुख मसूद अजहरवर ७० लाख रुपयांचे इनाम जाहीर करणे हा त्यांचा एक नवा देखावा आणि आंतरराष्ट्रीय समुदायाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न आहे. भारताने अधिकृतपणे यावर टीका करत पाकिस्तानचा हा दावा फोल आणि 'खोखला' असल्याचे म्हटले आहे. पाकिस्तानच्या या बनवेगिरी मागे उद्देश दडला आहे. टेरर फंडिंग आणि मनी लाँड्रिंगवर लक्ष ठेवणाऱ्या या संस्थेच्या 'ग्रे लिस्ट'मध्ये (नकारात्मक यादी) पुन्हा स्थान मिळू नये म्हणून पाकिस्तानने हा तात्पुरता देखावा केला आहे.

ऑक्टोबर २०२६ मध्ये फायनान्शियल अँक्शन टास्क फोर्सची महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. टेरर फंडिंग आणि ग्रे लिस्टमध्ये पुन्हा जाण्याच्या भीतीने आंतरराष्ट्रीय समुदायाला दाखवण्यासाठी पाकिस्तानने ही चाल खेळली आहे. पाकिस्तान मध्येच दडून बसलेल्या मसूद अझरच्या बनवेगिरीवर भारताने पाकिस्तानच्या देखाव्याला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, पाकिस्तानने अशा खोखल्या घोषणा करण्याऐवजी दहशतवाद्यांवर थेट आणि ठोस कारवाई करावी. भारताने पाकिस्तानचा हा पाऊल म्हणजे केवळ एक "दिखावा" आणि ढोंग असल्याचे म्हटले आहे.

मसूद अझहर हा भारताचा मोस्ट वॉन्टेड दहशतवादी असून, तो पाकिस्तानमध्येच उघडपणे फिरत आहे आणि त्याला तेथील यंत्रणांचेच संरक्षण लाभले आहे, असा भारताचा स्पष्ट आरोप आहे. त्यामुळे, दहशतवादाविरोधात कोणतीही ठोस कारवाई न करता, केवळ जागतिक निर्बंधांपासून वाचण्यासाठी पाकिस्तानने रचलेली ही एक 'बनवाबनवी' किंवा नवीन चाल मानली जात आहे. भारतीय गुप्तचर यंत्रणांच्या तांत्रिक विश्लेषणानुसार मसूद अजहर हा कुठेही पळालेला नसून पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील नवाबशाह येथेच सुरक्षित आश्रयाला आहे. भारताचा दावा पाकिस्तानने फेटाळून लावला असून मसुद पाकिस्तानात नसून अफगाणिस्तान मध्ये पळून गेल्याचे म्हटले आहे.

अफगाणिस्तानमधील तालिबान सरकारने पाकिस्तानचा हा दावा स्पष्टपणे फेटाळून लावला आहे आणि मसूद अजहर त्यांच्याकडे नसल्याचे म्हटले आहे.

**मसूद अजहर कोण आहे?**

मसूद अजहर हा भारतासाठी मोस्ट वॉन्टेड दहशतवादी असून, तो पाकिस्तानस्थित 'जैश-ए-मोहम्मद' या दहशतवादी संघटनेचा संस्थापक आणि प्रमुख आहे.

मसूद अजहर भारतामधील अनेक मोठ्या हल्ल्यांचा मास्टरमाईंड आहे. यात २००१ ची संसदेवरील हल्ला, २००८ चा मुंबई हल्ला, २०१६ चा पठाणकोट एअरबेस हल्ला आणि २०१९ चा पुलवामा बॉम्बस्फोट यांचा समावेश आहे.

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने मे २०१९ मध्ये मसूद अजहरला आंतरराष्ट्रीय जागतिक दहशतवादी म्हणून घोषित केले आहे. १९९४ मध्ये भारतात त्याला अटक झाली होती. परंतु, डिसेंबर १९९९ मध्ये इंडियन एअरलाइन्सच्या IC-814 विमानाचे अपहरण झाल्यानंतर प्रवाशांच्या सुटकेच्या बदल्यात त्याला सोडावे लागले होते. सुटकेनंतर त्याने 'जैश-ए-मोहम्मद'ची स्थापना केली.

एकीकडे पाकिस्तान मसूद अजहरच्या अटकेसाठी ७० लाखांचे बक्षीस दाखवत आहे, तर दुसरीकडे जैश-ए-मोहम्मद संघटना पाकिस्तानमध्ये अगदी उघडपणे दहशतवादी कारवायांसाठी निधी गोळा करत असल्याचे व्हिडिओ समोर आले आहेत. जैशच्या सदस्यांनी वर्षभरात तब्बल १५० कोटी रुपये जमा केल्याची कबुली दिली आहे, ज्यावरून पाकिस्तानचा हा केवळ एक 'फार्स' (नाटक) असल्याचे सिद्ध होते

थोडक्यात सांगायचे तर, मसूद अजहर पाकिस्तानातच सुरक्षित आश्रयाला आहे, मात्र जागतिक निबंर्धांपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी पाकिस्तानने ७० लाखांचे बक्षीस जाहीर करण्याचा हा नवा बनाव रचला आहे. ज्या दहशतवाद्याला स्वतः पाकिस्ताननेच पोसले आणि सुरक्षित ठेवले आहे, त्यालाच 'फरार' दाखवून त्यावर ७० लाखांचे बक्षीस लावणे हे पाकिस्तानचे जुनेच नाटक असल्याचे उघड झाले आहे.मसूद अझहरला पकडण्याचा पाकिस्तानचा कोणताही प्रामाणिक हेतू नसून, आंतरराष्ट्रीय निर्बंधांमधून स्वतःची कातडी वाचवण्यासाठी ७० लाखांचे बक्षीस जाहीर करण्याचा हा नवा कांगावा आहे.

- ९५६१५९४३०६

# एकतर्फी विजयासह भारताचा मालिकेवर कब्जा

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

फ्रेंडशिप चषक मालिकेच्या दुसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात भारताने अफगाणिस्तानला सात गडी राखून पराभूत करत तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी अजय आघाडी घेतली. नवी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानने २० षटकांत ८ गडी गमावून १५९ धावा केल्या. प्रत्युत्तरात, संजू सॅमसनच्या वेगवान अर्धशतकाच्या आणि अभिषेक शर्माच्या उपयुक्त खेळीच्या जोरावर भारताने १४.५ षटकांतच लक्ष्य गाठले.

**सॅमसन आणि अभिषेकची धमाकेदार खेळी**

१६० धावांचे लक्ष्य गाठताना संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा यांनी भारताला वेगवान सुरुवात करून दिली. या दोन्ही फलंदाजांनी पॉवरप्लेमध्ये भारताला ८२ धावांपर्यंत पोहोचवले. अभिषेक शर्मानें ३९ धावा केल्या, तर आक्रमक फलंदाजी करणाऱ्या संजू सॅमसनने सात चौकार आणि चार षटकार ठोकले.

सॅमसनने अवघ्या २० चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले, जे टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील त्याचे सर्वात जलद अर्धशतक ठरले. त्याने अफगाण गोलंदाजांवर दबाव कायम ठेवला आणि भारतीय संघाला लक्ष्याच्या अगदी जवळ आणून ठेवले.

**सॅमसनचे सर्वात जलद टी२० आंतरराष्ट्रीय अर्धशतक**

अरुण जेटली स्टेडियमवर २४,२१५ प्रेक्षकांसमोर, संजू सॅमसनने चौकार मारून आपले सर्वात जलद टी२० आंतरराष्ट्रीय अर्धशतक पूर्ण केले. त्यानंतर त्याने राशीद खानच्या गोलंदाजीवर आणखी एक षटकार ठोकला. मात्र, राशीद खानने पॉवरप्लेच्या शेवटच्या चेंडूवर सॅमसनला बाद केले. सॅमसनने चेंडू हवेत खेळण्याचा प्रयत्न केला, पण मोहम्मद नबीने त्याचा झेल घेतला. त्याने ३१ चेंडूंमध्ये ५७ धावांची शानदार खेळी केली.

यानंतर, ईशान किशन आणि कर्णधार श्रेयस अय्यर यांनी भारताचा डाव सावरला. ईशान किशनने २३ चेंडूंमध्ये नाबाद ३८ धावा केल्या. श्रेयस अय्यरने आपल्या ११ धावांच्या खेळीदरम्यान एक्स्ट्रा कव्हरवरून एक शानदार षटकार मारला, पण लवकरच स्लिप्समध्ये इब्राहिम झद्रानने त्याचा झेल घेतला. या विकेटसह राशीद खानने आपली तिसरी विकेट घेतली. त्यानंतर ईशान किशनने पुढील विकेट्स गमावल्या नाहीत आणि भारताने १४.५ षटकांत सात गडी राखून सामना जिंकला.

**अफगाणिस्तानची कमकुवत सुरुवात**

नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर भारतीय संघाने जोरदार सुरुवात केली. जसप्रीत बुमराहने डावातील एकही धाव देता षटक टाकले. त्यानंतर अर्शदीप सिंगने रहमानुल्ला गुरबाजला बाद केले, गुरबाज सलग दुसऱ्यांदा शून्यावर बाद झाला. अफगाणिस्तानचा कर्णधार इब्राहिम झद्रानने ३७ धावांची खेळी करून डाव सावरण्याचा प्रयत्न केला. त्याने बुमराह आणि अर्शदीपविरुद्ध काही शानदार चौकार मारले. सिद्दीकुल्ला अटलनेही १२ धावा केल्या, ज्यामुळे पॉवरप्लेनंतर अफगाणिस्तानची धावसंख्या ४१ धावांवर एक गडी बाद अशी झाली.

**नबी आणि रशीदने डावाला आधार दिला**

अफगाणिस्तानचे फलंदाज नियमित अंतराने विकेट्स गमावत राहिले. रवी बिश्नोई चेंडू पकडू न शकल्याने अझमतुल्ला उमरझाईलाही जीवदान मिळाले. मात्र, अक्षर पटेलने आपल्या शेवटच्या षटकात उमरझाईला बाद केले. त्यानंतर अर्शदीप सिंगने दरवेश रसूलीला बाद केले. तिलक वमार्ने लाँग ऑफच्या दिशेने धावत जाऊन एक अप्रतिम झेल घेतला. १०० धावांवर सहा गडी बाद झाल्यामुळे अफगाणिस्तान अडचणीत सापडला होता.

**नबी आणि रशीदची आक्रमक फलंदाजी**

कठीण परिस्थितीत, मोहम्मद नबी आणि राशीद खान यांनी आक्रमक फलंदाजी करून अफगाणिस्तानचा डाव सावरला. नबीने रवी बिश्नोईविरुद्ध एक चौकार आणि एक षटकार मारला, तर राशीद खानने वेगवान गोलंदाजांना लक्ष्य केले. राशीदने अर्शदीप सिंगच्या एका षटकात दोन चौकार आणि एक षटकार मारून १६ धावा केल्या. मात्र, जसप्रीत बुमराहने डावाच्या १९व्या षटकात मोहम्मद नबीला बाद करून ही भागीदारी तोडली. नितीश कुमार रेड्डीने २०व्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर राशीद खानला बाद केले. त्यानंतर नूर अहमदने शेवटच्या चेंडूवर षटकार मारून अफगाणिस्तानला २० षटकांत ८ गडी गमावून १५९ धावांपर्यंत पोहोचवले. भारतीय फलंदाजीसमोर ही धावसंख्या अपुरी ठरली. तिसरा टी२० सामना १७ सप्टेंबर रोजी खेळला जाईल.

या विजयामुळे भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. मालिकेतील तिसरा आणि अंतिम टी२० आंतरराष्ट्रीय सामना १७ सप्टेंबर रोजी त्याच अरुण जेटली स्टेडियमवर खेळला जाईल. भारतीय संघ आता मालिकेत निर्भेळ यश मिळवण्याच्या प्रयत्नात असेल. वैभव सूर्यवंशीसाठी अंतिम ११ मध्ये स्थान मिळवण्याची संधी निर्माण होऊ शकते. वैभव सूर्यवंशीने अलीकडेच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपली छाप पाडली आहे. आयपीएल २०२६ मध्ये ७०० हून अधिक धावा करून त्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आणि त्याला भारतीय संघात पहिल्यांदाच स्थान मिळाले.

मात्र, अफगाणिस्तानविरुद्धच्या पहिल्या दोन टी-२० सामन्यांमध्ये तो अंतिम ११ मध्ये नव्हता. पहिल्या सामन्यात, संजू सॅमसनला अभिषेक शमासोबत डावाची सुरुवात करण्याची संधी देण्यात आली. दुसऱ्या सामन्यातही संघाने आपल्या फलंदाजीच्या क्रमात कोणतेही मोठे बदल केले नाहीत. आता भारताने मालिका जिंकल्यामुळे, तिसऱ्या सामन्यात वैभवला संधी मिळण्याची शक्यता वाढली आहे. मात्र, अंतिम निर्णय संघ व्यवस्थापन आणि कर्णधार श्रेयस अय्यर घेतील.

**संजू सॅमसनच्या संघात परतल्यानंतर वैभवला वगळण्यात आले**

संजू सॅमसनच्या संघात परतल्यानंतर वैभव सूर्यवंशीला अंतिम ११ मधून वगळण्यात आले. यापूर्वी, झिम्बाब्वे दौऱ्यात वैभव तिन्ही टी-२० सामने खेळला होता, कारण त्यावेळी संजू सॅमसन संघात नव्हता. झिम्बाब्वे दौऱ्यात वैभवने उत्कृष्ट कामगिरी केली आणि त्याला मालिकावीर म्हणून गौरविण्यात आले. त्याने या मालिकेत ५०, २० आणि ८१ धावा केल्या. असे असूनही, अफगाणिस्तानविरुद्ध सॅमसनच्या पुनरागमनानंतर वैभवला पहिल्या दोन सामन्यांमध्ये स्थान देण्यात आले नाही.

**वैभव आणि संजू एकत्र सलामी देऊ शकतात का?**

वैभव सूर्यवंशी आणि संजू सॅमसन आतापर्यंत एकाच भारतीय प्लेइंग इलेव्हनमध्ये एकत्र खेळलेले नाहीत. ज्या तीन सामन्यांमध्ये संजू सॅमसन संघाबाहेर होता, त्या तिन्ही सामन्यांमध्ये वैभवने आंतरराष्ट्रीय पदार्पण केले.

तिसऱ्या टी-२० सामन्यात हे समीकरण बदलू शकते. जर संघ व्यवस्थापनाने अभिषेक शमार्ला विश्रांती देण्याचा निर्णय घेतला, तर वैभव सूर्यवंशी आणि संजू सॅमसन यांना डावाची सुरुवात करण्यासाठी मैदानात उतरवले जाऊ शकते. अशा परिस्थितीत, दोन्ही फलंदाज पहिल्यांदाच भारतीय संघात एकत्र असू शकतात. तथापि, सध्या तरी हे केवळ एक संभाव्य संयोजन आहे. भारताचा अंतिम संघ नाणेफेकीनंतरच निश्चित होईल.

- ९०९६३७२०८२

# मारबत उत्सव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याच्या प्रयत्नात, सरकारने मुख्य समस्या घेऊन येणाऱ्या बडग्यांच्या धारदार आवाजाला बोथट केले!

**रमेश लांजेवार**
**नागपूर**

मारबत उत्सव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचे कार्य सरकारने केले याचे मनापासून स्वागत. परंतु या उत्सवाच्या दरम्यान राज्यातील वर्षभरातील राजकीय-सामाजिक समस्यां, उथलपुथल आणि इतर समस्यांच्या बाबतींत निघणारे बडगे नागपूरकरांसह संपूर्ण महाराष्ट्राचे आकर्षण रहायचे परंतु ते यावर्षी तसे काही दिसले नाही व चर्चेचा विषय सुध्दा बनले नाही त्यामुळे मारबत बढग्यांना घेऊन गेली की काय असे सर्वत्र चित्र दिसत होते.मारबत उत्सव हा नागपूरकरांनसाठी ऐतिहासिक आणि पारंपरिक उत्सव आहे. मारबत उत्सवाची सुरूवात स्वतंत्रपुर्व काळापासून म्हणजे इंग्रजांच्या काळात सुरू करण्यात आली.

यामागचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांना एकत्रित करून इंग्रजांविरूध्द मोठा लढा उभा करणे. कालांतराने हा उत्सव समाजातील वाईट चालीरितीचा व वाईट रूढींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे या सणाचे उद्दीष्ट ठरले. येणारे विघ्न दुर करण्यासाठी १८८१ मध्ये काळ्या मारबतीची सुरूवात झाली. यानंतर १८८४ मध्ये पिवळ्या मारबतीची सुरूवात झाली. आज काळ्या मारबतीला १४५ वर्षे पूर्ण झाले तर पिवळ्या मारबतीला १४२ वर्षे पूर्ण होत आहे. हा एक इतिहास आहे.परंतु सरकारने मारबत उत्सव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याच्या प्रयत्नात बडग्यांना महापालिकेने पायाखाली तुडविल्याचे दिसून आले. कारण यावर्षी मारबत उत्सवातदेश-विदेशातील प्रमुख पाहुणे मंडळी व राज्यातील राजकीय नेते प्रामुख्याने उपस्थित होते. यात परदेशी पाहुण्यांनमध्ये पॅट्रिक लेव्हेरीनो (फ्रान्सचे मुंबईतील कौन्सुल जनरल),मोनिका नागेलगाड (नॉवेर्चे मुंबईतील कौन्सुल जनरल), पेट्रा थेमन (फिनलंडच्या हेड ऑफ मिशन आणि कौन्सुल जनरल) आणि क्रीडा क्षेत्रातील उमेश यादव (भारतीय क्रिकेटपटू) व चित्रपट सृष्टीतील जॅकी श्रॉफ(प्रसिद्ध अभिनेते), अंकुश चौधरी, दिग्दर्शक सुभाष घई इत्यादी अनेक मान्यवरांसह अनेक मंत्री व राजकीय पुढारी प्रामुख्याने उपस्थित होते. त्यामुळे मारबत उत्सवात हीच मंडळी आकर्षण बनली व बडग्यांचे आकर्षण आपोआप कमी झाल्याचे दिसून आले.

पुर्वी नागपूरमध्ये जेवढे काही बडगे निघायचे त्यांची गुंज (आवाज) संपूर्ण भारतभर जायची व सर्वत्र मोठ्या प्रमाणात चर्चा व्हायची.कारण यात जनसामान्यांच्या आवाज, समस्या व जनतेचा आक्रोश असलेल्या बडग्या व त्यांचा जल्लोष आणि सत्तेत असलेल्या सरकारला एक चांगला संदेश देऊन जागृत करणे बगडग्यांचे मुख्य उद्दिष्ट रहायचे परंतु यंदा समाज जागृतीची बढग्यांची धारदार तलवार मनपाने बोथट केली व बडग्यापासून मिळणारा जनसामान्यांचा संदेश व आनंद दुरावला.त्यामुळे असे वाटत आहे की, सरकारला समज देणारा बढग्यांचा आवाज सरकारने पुर्णतः दाबला की काय असे चित्र दिसून आले.

कारण बडग्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या आत्महत्या, दुष्काळ, पेपर फुटीच्या प्रकरणातील गुन्हेगार, रोडचे खड्डे, महिलांवरील अत्याचार, अशोक खरात सारखे प्रकरण, भ्रष्टाचार, घोटाळेबाज, टीईटी घोटाळा, महागाई, बेरोजगारी, एमपीएससी घोटाळा, आरक्षण, एआयमुळे बेरोजगारांवर आलेले संकट व वर्षभर घडलेल्या मुद्दांवर निघालेल्या घटनांवरील जाब विचारण्याची संधी बढग्यांनी गमावली की काय असे चित्र यावर्षी स्पष्ट दिसून आले. उलट पाकिस्तान, दहशतवाद आणि स्मार्ट मीटरविरोधापुरतेच राजकीय- सामाजिक भाष्य अधिक ठळक राहिले. त्यामुळे बडग्यांचा आवाज मनपाने मारबत उत्सवाच्या दरम्यान दाबला की काय असे वाटायला लागले. त्याचप्रमाणे महापालिकेने मारबत उत्सव ग्लोबल करण्यासाठी आणलेल्या व्हिआयपी झगमगाटामुळे बडग्यांचा धारदार आवाज बोथड केला.

यावर्षी नागपूरची परंपरा व्हिआयपी झगमगाटात पुर्णपणे हरवली की, काय असे चित्र दिसून आले. मारबत नेहमीप्रमाणे निघाली आणि घेऊन जा गे मारबतच्या आवाजाचा गजरही सर्वत्र झाला, परंतु सत्तेने सरकारला जाब विचारणाऱ्या बढग्यांना धाराशाही करून त्यांचा आवाज बोथट केला.त्यामुळे नागपूरकरांना शंका आहे की, बढग्यांना मारबत घेऊन गेली की काय! असे वाटायला लागले. मारबत उत्सवाच्या निमित्ताने राज्यातील जनतेच्या समस्या, अडीअडचणी, बेरोजगारीची समस्या, पेपर फुटीमुळे विद्यार्थ्यांच्या समस्या, शेतकऱ्यांच्या समस्या, एमपीएससी पेपरफुटी प्रकरण इत्यादी अनेक समस्यांचा अंबार सरकारपर्यंत पोहचविण्याचे काम बढग्यांच्या माध्यमातून नेहमीच होत होते आणि याची चर्चा नागपूरपासून राज्यभर आणि राज्यापासून देशभर रहात होती. परंतु या सर्व समस्या राजकीय पुढारी व व्हिआपी लोकांनी संपुष्टात आणल्याचे दिसून आले. नागपूर मारबत उत्सवात बडग्यांचा जल्लोष किंवा आवाज नाही म्हणजे राज्यात काहीच समस्या नसून सर्व काही ठीक आहे अशा पध्दतीचा मारबत उत्सव यावर्षी दिसून आला. त्याचप्रमाणे यावर्षी राजकीय-सामाजिक प्रश्नांवरचा आवाज क्षीण झाल्याचे दिसून आले. मारबत- बडग्याचा हा सोहळा इंग्रजांच्या सत्तेला आव्हान देत सुरू झाला. तेव्हापासुन अन्याय, भ्रष्टाचार, अत्याचार, आणि सरकारच्या चुकीच्या धोरणाविरोधात बढग्यांनी नेहमी आवाज उठविला आहे.

- ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

दैनिक सिंहवाणी वृत्त


# वाळू वाहतूकदारांकडून वसुलीचा कथित 'खेळ!

## कारवाईची भीती दाखवून पैसे उकळल्याचा आरोप, आठ जणांवर गुन्हा, कॉल रेकॉर्ड अन् आर्थिक व्यवहार पोलिसांच्या रडारवर

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
शासनाची रॉयल्टी भरून वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनमालकांनाच कारवाईची भीती दाखवून पैसे उकळले जात असल्याच्या आरोपाने वाळू वाहतुकीच्या व्यवसायातील कथित वसुलीच्या खेळाला तोंड फुटले आहे. ट्रक मालकांच्या तक्रारीवरून उमरेड पोलिसांनी आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, मोबाईल कॉल रेकॉर्डपासून आर्थिक व्यवहारांपर्यंत तपास सुरू केला आहे. त्यामुळे या कथित वसुलीमागे नेमके कोणाचे हात आहेत, याकडे आता लक्ष लागले आहे.
गुन्हा दाखल झालेल्यांमध्ये शोएब अस्लम पठाण, यदुनाथ डाहाणे, सुरेंद्र निकोसे, शेराभाई, फैय्याज रहमानी, प्रवीण मुद्दमवार आणि अन्य एकाचा समावेश असल्याची माहिती आहे.

**कारवाईची भिती दाखवून वसुली**

चांदूरबाजार येथील वाहतूक व्यावसायिक रौनक संजय हिमते (३५) हे पवनी, जिल्हा भंडारा येथील वाळू घाटावरून रॉयल्टी भरून टिप्परद्वारे वाळूची वाहतूक करतात. ९ सप्टेंबरच्या रात्री वाळू वाहतूक सुरू असताना काही व्यक्तींनी हिमते यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांना काटोल, उमरेड एमआयडीसी परिसरासह विविध ठिकाणी अडविल्याचा आरोप आहे.
यावेळी अवैध वाळू वाहतुकीचा गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन पैशांची मागणी करण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. प्रकार संशयास्पद वाटल्याने हिमते यांनी उमरेड पोलिसांत तक्रार दाखल केली.

**अमरावतीच्या ट्रक मालकांची धावाधाव**

कथित वसुलीच्या प्रकारामुळे त्रस्त झालेल्या हिमतेसह अमरावतीतील आणखी काही ट्रक मालकांनी हा प्रकार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निदर्शनास आणून दिल्याची माहिती आहे. बावनकुळे यांनी नागपूर ग्रामीणचे पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांना माहिती देऊन चौकशीच्या सूचना केल्याचे सांगण्यात येते.
पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार आणि अतिरिक्त पोलिस अधीक्षक अनिल मस्के यांनी संबंधित ट्रक मालकांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर उमरेड पोलिस ठाण्यात तक्रार देण्याची सूचना केल्याची माहिती आहे. त्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास उमरेडचे उपविभागीय पोलिस अधिकारी मयंक माधव यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

**खाकीपर्यंत पैसा गेला का?**

या प्रकरणातील सर्वांत गंभीर आरोप म्हणजे कथित वसुलीतील काही रक्कम पोलिस कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचल्याचा आरोप आहे. ट्रक मालकांकडून काही 'खाकी'धाऱ्यांचा सहभाग असल्याचा आरोप करण्यात आला आहे. मात्र, या आरोपांना अद्याप स्वतंत्र अधिकृत पुष्टी मिळालेली नाही. त्यामुळे तपासाची दिशा आता महत्त्वाची ठरणार आहे. आरोपींचे जबाब, मोबाईलमधील कॉल रेकॉर्ड, ऑनलाइन व्यवहार, बँकिंग व्यवहार आणि पैशांच्या देवाणघेवाणीचे डिजिटल पुरावे तपासले जात असल्याचे सांगण्यात येते. या व्यवहारांची साखळी उलगडली तर कथित वसुलीचा पैसा नेमका कुठपर्यंत पोहोचला, याचे उत्तर मिळू शकते.

**८० हजार कुणाच्या घशात?**

कारवाईच्या भीतीपोटी एका ट्रक मालकाने मागील आठवड्यात पवनी (जी. भंडारा) येथील एका व्यक्तीला ८० हजार रुपये दिल्याचा आरोप चर्चेत आहे. ही रक्कम पुढे एका पोलिस कर्मचाऱ्याला दिल्याचाही दावा करण्यात आला आहे. मात्र, या व्यवहाराची अधिकृत पुष्टी झालेली नाही. त्यामुळे ८० हजारांची रक्कम प्रत्यक्षात कोणाकडे गेली? व्यवहार रोखीत झाला की ऑनलाइन? त्याचा कोणता डिजिटल पुरावा आहे? आणि या व्यवहारामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का? या प्रश्नांची उत्तरे तपासातूनच स्पष्ट होणार आहेत.

**वाळूच्या धंद्यात 'वसुली'ची सावली**

वाळू वाहतूकदारांकडून मोठ्या प्रमाणात पैसे घेतल्याच्या आरोपाने नागपूर, अमरावतीसह भंडारा, गडचिरोली आणी वर्धा जिल्ह्यातील वाळू व्यावसायिकांचेही लक्ष या प्रकरणाकडे लागले आहे. एखाद्या वाहनाची कागदपत्रे तपासणे आणि कायदेशीर कारवाई करणे हा पोलिस-प्रशासनाचा अधिकार; मात्र त्याच अधिकाराचा धाक दाखवून पैसे उकळले जात असतील तर तो गंभीर प्रश्न ठरतो. आता तपास यंत्रणेसमोर केवळ आठ आरोपींची नावे तपासण्याचे आव्हान नाही, तर पैशांचा प्रवास, संपर्कांची साखळी आणि कथित 'खाकी कनेक्शन' याचीही सत्यता पडताळण्याचे आव्हान आहे. आरोप खरे असतील तर त्यामागील सूत्रधार कोण, हे समोर येणे गरजेचे आहे. आणि आरोप तथ्यहीन असतील तर तेही तपासातून स्पष्ट झाले पाहिजे.

# कोतवाल पदांच्या आरक्षण सोडतीकडे इच्छुकांच्या नजरा!

## गुरुवारी नरखेड तहसील कार्यालयात सोडत, १० गावांतील रिक्त पदांसाठी होणार प्रक्रिया

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
महसूल विभागातील कोतवाल पदांच्या भरतीची तयारी सुरू झाली असून, नरखेड तालुक्यातील १० गावांमधील रिक्त कोतवाल पदांसाठी गुरुवारी (दि. १७ सप्टेंबर) आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. नरखेड तहसील कार्यालयाच्या वतीने यासंदर्भात जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला असून, आरक्षण सोडतीकडे संबंधित गावांतील इच्छुक उमेदवारांचे लक्ष लागले आहे.
नरखेड तालुक्यात कोतवालांची एकूण १० पदे मंजूर असून, मोवाड, मोहदी दळवी, खरसोली, तिनखेडा, खेडी गो. गो., सिंदी, पिंपळगाव राऊत, भारसिंगी, जलालखेडा आणि अंबाडा सायवाडा या गावांतील प्रत्येकी एका रिक्त पदासाठी ही प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.
शासनाच्या बिंदुनामावलीनुसार संबंधित रिक्त पदांचे सामाजिक तसेच लागू असलेले इतर आरक्षण निश्चित केले जाणार आहे. यामध्ये एकूण पदांपैकी ३० टक्के जागा महिलांसाठी आरक्षित राहणार आहेत. त्यामुळे कोणत्या गावातील कोतवाल पद कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षित होणार, याबाबत इच्छुक उमेदवारांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.
कोतवाल हे महसूल प्रशासनातील गावपातळीवरील महत्त्वाचे पद मानले जाते. महसूल विभागाशी संबंधित विविध कामांमध्ये प्रशासनाला सहकार्य करण्यासह गावातील शासकीय यंत्रणा आणि नागरिक यांच्यात समन्वय साधण्याची भूमिका कोतवालांकडून पार पाडली जाते. त्यामुळे या पदाच्या भरतीकडे संबंधित गावांतील तरुणांचे विशेष लक्ष आहे.
गुरुवारी सायंकाळी ४ वाजता नरखेड तहसील कार्यालयात आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. सोडत प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक गावातील पदाचे आरक्षण स्पष्ट होणार असून, त्यानंतर पुढील भरती प्रक्रियेचा मार्ग मोकळा होणार आहे. त्यामुळे आरक्षण सोडतीनंतर भरतीच्या जाहिरातीची आणि पुढील प्रक्रियेची इच्छुकांकडून प्रतीक्षा केली जात आहे.


महाराष्ट्र शासन
तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नरखेड यांचे कार्यालय
07105-232206 Email ID - tahsildarnarkhed1@gmail.com
क्र./आस्था/तह.न./कावि- 141/2026 दिनांक:- 10 / 09 /2026

-: जाहीरनामा :-

विषय :- महसूल सेवक (कोतवाल) पदभरतीकरिता बिंदूनामावलीनुसार रिक्त पदांचे आरक्षण निश्चित करण्यासाठी आरक्षण सोडत आयोजित करण्याबाबत.

संदर्भ :- 1) मा. कार्यासन अधिकारी महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे कडील पत्र क्र. पदभ-2025/प्र./क्र.98/आस्था-10, दिनांक 19 ऑगस्ट, 2026.
2) मा. निवासी उपजिल्हाधिकारी, नागपूर यांचे दिनांक 09.09.2026 चे सभेतील निर्देश.

याद्वारे सर्व संबंधित नागरिक, इच्छुक उमेदवार तसेच संबंधित गावातील नागरिकांना कळविण्यात येते की, तहसील कार्यालय, नरखेड यांच्या अधिनस्त महसूल विभागातील महसूल सेवक (कोतवाल) पदांची भरती प्रक्रीया शासनाच्या प्रचलित नियम व तरतुदींनुसार राबविण्यात येणार आहे. सदर पदभरती प्रक्रियेंतर्गत खालील गावांमध्ये महसूल सेवक (कोतवाल) पदे भरण्यात येणार आहेत :-

| अ.क्र. | गावाचे नाव | साझा क्र. | मंजूर/भरण्यात येणारी पदसंख्या |
| --- | --- | --- | --- |
| 1 | मोवाड | 01 | 01 |
| 2 | मोहदी दळवी | 04 | 01 |
| 3 | खरसोली | 06 | 01 |
| 4 | तिनखेडा | 08 | 01 |
| 5 | खेडी गो. गो. | 14 | 01 |
| 6 | सिंदी | 16 –अ | 01 |
| 7 | पिंपळगाव राउत | 28 | 01 |
| 8 | भारसिंगी | 30 | 01 |
| 9 | जलालखेडा | 31 | 01 |
| 10 | अंबाडा सायवाडा | 36-अ | 01 |
| | एकुण | | 10 |

वरीलप्रमाणे एकुण 10 महसूल सेवक (कोतवाल) पदे भरण्यासाठी पदांची मान्यता प्राप्त असून, सदर पदांसाठी शासनाच्या प्रचलित नियमांनुसार बिंदूनामावली (Roster) विचारात घेऊन रिक्त पदांचे सामाजिक व इतर लागू आरक्षण निश्चित करणे आवश्यक आहे. **वरील पदापैकी 30 % आरक्षण महिलाकरीता राखीव राहील.**

## भांडेवाडी (टोला) येथे गणेश उत्सव



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू :मौदा**
गट ग्रामपंचायत भांडेवाडी अंतर्गत येणाऱ्या भांडेवाडी (टोला) येथे मागील ३४ वर्षांपूर्वी पासून न्यू बाल मित्र गणेश उत्सव मंडळातर्फे सुरू असलेले गणेश उत्सव यंदा ३५ व्या वर्षीही विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन उत्साहात व शांततेत सुरू आहे. गणेश उत्सवाच्या यशस्वीतेसाठी न्यू बाल मित्र गणेश उत्सव मंडळाचे अध्यक्ष जीवन मारोती राऊत, विजय भाऊराव नेवारे ,महेश लक्ष्मण भोयर, दुर्गेश दामोधर वघारे ,योगेश परमेश्वर राऊत, उज्वल भारत राऊत, सुमेश राजेंद्र काळसर्पे, मनोज प्रभाकर वघारे, निखिल विष्णू राऊत, सुशील परमेश्वर राऊत, कैलास बाजीराव राऊत परिश्रम घेत असून समस्त ग्रामवासी सहकार्य करत आहे.

# अवैध गोवंश वाहतुकीवर पडोली पोलिसांचा छापा : ५.५५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर (धनंजय पांढरे)**
अवैधरित्या गोवंशीय जनावरांची वाहतूक करणाऱ्या वाहनावर पडोली पोलिसांनी कारवाई करत तीन गोवंशीय जनावरांसह बोलेरो पिकअप वाहन असा एकूण अंदाजे ५ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई १५ सप्टेंबर २०२६ रोजी पडोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका पिकअप वाहनातून गोवंशीय जनावरांची अवैधरित्या वाहतूक होत असल्याची



माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी कारवाई केली.
वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये तीन गोवंशीय जनावरे आढळून आली. पोलिसांनी तत्काळ जनावरांची सुटका करून पिकअप वाहन ताब्यात घेतले. या कारवाईत बोलेरो पिकअप वाहन व तीन गोवंशीय जनावरे असा अंदाजे ५ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.
याप्रकरणी शिवनगर वॉर्ड, घुग्घुस येथील अनिमुद्दीन गुलबुद्दीन शेख २४ वर्ष याच्याविरुद्ध प्राण्यांवर क्रूरता प्रतिबंध अधिनियम १९६० चे कलम ११(१)(डी), महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ (सुधारित २०१५) मधील कलम ५, ५(अ), ५(ब), ९ तसेच महाराष्ट्र पोलीस कायद्यातील कलम ११९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर कारवाई पडोली पोलीस ठाण्याचे ठाणेदार सुधाकर कोकोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सफौ प्रेमदास टेकाम, पोअं गोपीनाथ नरोटे, विठ्ठल राठोड यांनी केले. प्रकरणाचा पुढील तपास पडोली पोलीस करीत आहेत.

# निर्मल नगरीत ऋषिपंचमी उत्सवात व भक्तिभावात भक्तांचा उसळला जनसागर

## दहा हजारांहून अधिक भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ, रक्तदान शिबिरालाही उत्स्फूर्त प्रतिसाद







**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर देवराव प्रधान**
उमरेड मार्गावरील निर्मल नगरी येथील श्री संत गजानन महाराज मंदिरात संत गजानन महाराज सेवा ट्रस्टच्या वतीने श्रींचा ११६ वा संजीवन समाधी दिन, पुण्यतिथी व ऋषिपंचमी उत्सव मंगळवारी (१५ सप्टेंबर) भक्तिभावात संपन्न झाला.
उत्सवानिमित्त सकाळी अभिषेक, महाआरती, दुपारी भजन तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. दिवसभर मंदिरात भाविकांची मोठी गर्दी झाली असून दहा हजारांहून अधिक भाविकांनी श्रींचे दर्शन घेतले. 'गण गण गणात बोते'च्या जयघोषाने मंदिर परिसर भक्तिमय झाला.
मंगळवारी सायंकाळी ६ वाजल्यापासून महाप्रसादाचे वितरण सुरू झाले. भक्तांसाठी झुणका-भाकर, मसाले भात व शिऱ्याचा महाप्रसाद दहा हजारांहून अधिक भाविकांनी घेतला. रात्री १२ वाजेपर्यंत महाप्रसादाचे वितरण सुरू होते. रक्तदान शिबिरात सुमारे ५० ते ६० भाविकांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.
धार्मिक व सामाजिक उपक्रमांमुळे निर्मल नगरीतील ऋषिपंचमी उत्सवाला भक्ती, श्रद्धा आणि सेवाभावाचे स्वरूप लाभले. विशेष म्हणजे संत गजानन महाराज सेवा ट्रस्ट सेवा समितीचे सर्व पदाधिकारी व आयोजक तसेच भक्तगणांनी अथक परिश्रम घेतले.

थोडक्यात

## चंद्रशेखर आझाद यांच्यावरील कथित हल्ल्याच्या निषेधार्थ नागपुरात प्रदर्शन




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
आजाद समाज पार्टी (कांशीराम) चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा नगीना लोकसभा मतदारसंघाचे खासदार चंद्रशेखर आझाद यांच्या सोबत १३ सप्टेंबर रोजी, उत्तर प्रदेशातील बाराबंकी येथे घडलेल्या घटनेच्या निषेधार्थ नागपुरात आजाद समाज पार्टीच्या वतीने प्रदर्शन करण्यात आले. जिल्हाध्यक्ष ओपूल तामगाडगे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करून घटनेची निष्पक्ष चौकशी, संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई आणि चंद्रशेखर आझाद यांच्या सुरक्षेचा तातडीने आढावा घेण्याची मागणी करण्यात आली.
निवेदनाची प्रत पोलीस प्रशासनासह राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडेही पाठविण्यात येणार असल्याचे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या आंदोलनात जिल्हाध्यक्ष ओपूल तामगाडगे, जिल्हा उपाध्यक्ष आशिष निस्वादे, जिल्हा सचिव विशाल बनसोड, सुरज पुरानिक, रोशन ठवरे, जिल्हा महासचिव शोएब खान, अश्विन पाटील, दीपक पाटील, दक्षिण- पश्चिम विधानसभा अध्यक्ष बादल बनसोड, दीक्षा ताई चवरे यांच्यासह आजाद समाज पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनकर्त्यांनी घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करावी आणि लोकप्रतिनिधींच्या सुरक्षेबाबत आवश्यक ती खबरदारी घ्यावी, अशी मागणी केली.

## आयडियल टीचर म्हणून अनुराधा धुर्डे यांचा शिक्षणमंत्र्यांच्या हस्ते सत्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू: मौदा**
विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि भावनिक असा सर्वांगीण विकास साधण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंडलीची शैक्षणिक ओळख केंद्र, तालुका, जिल्हा तसेच राज्य स्तरावर निर्माण करणाऱ्या मुख्याध्यापिका कु. अनुराधा धुर्डे यांचा आयडियल टीचर म्हणून



महाराष्ट्राचे शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते सत्कार नुकताच करण्यात आला. प्राथमिक शिक्षण हा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा भक्कम पाया असतो. हे लक्षात घेऊन कु. अनुराधा धुर्डे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला केंद्रस्थानी ठेवून शाळेत विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, कला, सर्जनशील आणि कृतीआधारित उपक्रम राबविले. केवळ पाठ्यपुस्तकापुरते शिक्षण मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देत त्यांच्या आत्मविश्वासाला चालना देण्याचे काम त्यांनी केले.
विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड, सर्जनशीलता, नेतृत्वगुण, सहकार्याची भावना, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक जाणीव आणि आत्मविश्वास निर्माण व्हावा, यासाठी विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासालाही चालना मिळाली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व आनंददायी शिक्षण मिळावे, त्यांच्या कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळावे आणि छोट्याशा शाळेची मोठी ओळख निर्माण व्हावी, या उद्देशाने केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची दखल घेत आयडियल टीचर म्हणून झालेला हा सन्मान त्यांच्या शैक्षणिक कार्याला मिळालेली कौतुकाची थाप ठरली आहे. महाराष्ट्राच्या शालेय शिक्षणमंत्र्यांच्या हस्ते झालेला हा गौरव तोंडली शाळेसाठी तसेच विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांसाठी अभिमानाचा व प्रेरणादायी क्षण ठरला आहे. 'आयडियल टीचर 'म्हणून सत्कार झाल्यापासून मुख्याध्यापिका अनुराधा धुर्डे यांच्यावर सर्व स्तरातून कौतुकांच्या वर्षाव सुरू आहे.

## आजनगाव येथे नदीत फेकलेल्या गौमातेला बाहेर काढून बजरंग दलने केले अंत्यसंस्कार



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू :मौदा**
मौदा शहराजवळील आजनगाव येथे एका गौमातेला पुलावरून नदीत फेकून दिल्याची अत्यंत हृदयद्रावक घटना मंगळवार (ता. १५ सप्टेंबर)ला समोर आली. घटनेची माहिती मिळताच राष्ट्रीय बजरंग दल मौदा शहर अध्यक्ष हिमांशू वडे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी स्थानिक पोलीस पाटील तसेच मौदा पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांना घटनेची माहिती दिली. यानंतर राष्ट्रीय बजरंग दलाचे पदाधिकारी व कार्यकर्ते स्वतः नदीत उतरले आणि अथक प्रयत्न करून गौमातेला नदीतून बाहेर काढले. गौमातेप्रती श्रद्धा व आदर व्यक्त करत हिंदू धर्माच्या विधी-विधानानुसार तिचा अंतिम संस्कार करण्यात आला. या सेवाकार्यात अश्विन बाबरे, अंकित कोसारे, प्रदीप शेंडे, पवन भोजने आणि आकाश मेश्राम यांनी सक्रिय सहभाग घेतला. गौमातेवर अशा प्रकारे अत्याचार करणाऱ्या व्यक्तीचा शोध घेऊन कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रीय बजरंग दलाच्या वतीने करण्यात आली आहे.
गौमातेचे संरक्षण, सेवा आणि सन्मान ही प्रत्येक हिंदूची सामाजिक व नैतिक जबाबदारी आहे. अशा अमानुष घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी प्रशासनाने गांभीर्याने कारवाई करावी, असे राष्ट्रीय बजरंग दलाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

थोडक्यात

## गणेशोत्सवात महावितरणची 'ऊर्जा प्रबोधन महामोहीम'

### शाळा-महाविद्यालयांतून वाहणार हरित ऊर्जेची आणि सुरक्षेची गंगा!



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र शासनाच्या 'राज्य महोत्सव' संकल्पनेला साजेसा आणि उत्साही प्रतिसाद देत महावितरणने स्तुत्य आणि भव्य 'ऊर्जा प्रबोधन मोहीम' हाती घेतली आहे. 'हरित ऊर्जा आणि विद्युत सुरक्षेच्या माध्यमातून ऊर्जा स्वातंत्र्याकडे वाटचाल' या प्रेरक ध्येयाने प्रेरित होऊन १४ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत ही मोहीम व्यापक स्तरावर राबवण्यात येत आहे. या अभियानाचे खास वैशिष्ट्य म्हणजे 'अभियंता दिना'चे औचित्य साधून महावितरणचे शेकडो अभियंते सामाजिक बांधिलकी जपत थेट मैदानात उतरले आहेत. अतिरिक्त कार्यकारी अभियंत्यांपासून ते कनिष्ठ अभियंत्यांपर्यंतची संपूर्ण टीम शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना हरित ऊर्जा, वीज बचत आणि सुरक्षिततेचे मोलाचे धडे देत आहे. मंगळवारी नागपुरातील सीएमएस महाविद्यालय आणि अयोध्या नगर येथील श्री गजानन विद्यालयासह विविध शैक्षणिक संस्थांमध्ये हे उत्साहवर्धक प्रबोधन सत्र पार पडले. विद्यार्थी व नागरिकांना सक्षम बनवण्यासाठी महावितरणतर्फे पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज योजना, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (स्मार्ट) योजना, ई-व्हेंकिल धोरण, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, सौर कृषी पंप आणि 'गो ग्रीन' कागदविरहित कारभार यांसारख्या महत्त्वपूर्ण शासकीय योजनांची माहिती दिली जात आहे. सोबतच दैनंदिन आयुष्यात वीज अपघातांना आळा घालण्यासाठी घ्यावयाची खबरदारी आणि उपायांवरही मार्गदर्शन केले जात आहे.

केवळ शाळा-महाविद्यालयेच नव्हे, तर राज्यातील प्रमुख गणेशोत्सव मंडळांच्या माध्यमातूनही ही जनजागृती मोहीम राबवली जात आहे. उत्सवासाठी केवळ अधिकृत वीज जोडणीचाच वापर करावा, सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असणारे एछउइ (अर्थ लीकेज सर्किट ब्रेकर) उपकरण अनिवार्यपणे लावावे, ऊर्जेची बचत करण्यासाठी देखाव्यांमध्ये एलईडी दिव्यांचा जास्तीत जास्त वापर करावा आणि हरित ऊर्जेचा संदेश देणारे प्रबोधनात्मक देखावे उभारावेत, असे नम्र आवाहन महावितरणतर्फे करण्यात येत आहे. या राज्य महोत्सवात सर्व नागरिकांनी आणि गणेश भक्तांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन हरित ऊर्जा व विद्युत सुरक्षेचा हा मूलमंत्र आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावा, असे आग्रही आवाहन महावितरणने केले आहे.

## महावितरणच्या अभियंत्यांचे योगदान राज्याच्या प्रगतीला गती देणारे : सीएमडी लोकेश चंद्र

### महावितरणकडून अभियंता दिन उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

अभियांत्रिकी ही केवळ एक नोकरी किंवा व्यवसाय नसून तो देशाच्या प्रगतीचा आणि विकासाचा मुख्य कणा आहे. राज्यातील घरे, व्यवसाय, उद्योग, कृषी अशा ३ कोटींवर ग्राहकांकडे दररोज वीजपुरवठा पोहोचवण्यामागे अभियंत्यांचे कौशल्य व महत्वाचे योगदान आहे. वीजक्षेत्राच्या माध्यमातून महावितरणचे अभियंते राज्याच्या प्रगतीला गती देत आहेत, अशा शब्दांत महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी अभियंत्यांच्या योगदानाचा गौरव केला. भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी (दि. १५) 'प्रकाशगड' मुख्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी पाठवलेल्या शुभेच्छा संदेशामध्ये अभियंत्यांच्या कायार्चा गौरव करण्यात आला. ऊर्जा क्षेत्रात सध्या मोठे बदल होत असून हरित ऊर्जा, डिजिटलायझेशन आणि आधुनिक पायाभूत सुविधांवर भर दिला जात आहे. या बदलत्या काळात अभियंत्यांची भूमिका अधिक जबाबदारीची बनली आहे. त्यामुळे नवनवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा. वीजग्राहकांच्या तत्पर सेवेला आणि कामात सुरक्षितता व तांत्रिक उत्कृष्टतेच्या दर्जेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन लोकेश चंद्र यांनी केले.

यावेळी संचालक (संचालन) धनंजय औंढेकर म्हणाले की, ह्यमहावितरणच्या अभियंत्यांचे कार्यकौशल्य आणि अहोरात्र मेहनत यामुळे महावितरणसह राज्याची प्रगतीकडे वेगाने वाटचाल सुरु आहे. अभियंत्यांच्या याच प्रयत्नांमुळे भविष्यातील हरित क्रांती आणि शून्य प्रदूषणाचे उद्दिष्ट निश्चितपणे साध्य होईल. संचालक (वाणिज्य) योगेश गडकरी यांनी महावितरण समोरील बदलत्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी अभियंत्यांनी अधिक जोमाने काम करण्याची गरज व्यक्त केली. संचालक (प्रकल्प) सचिन तालेवार यांनी विविध आघाड्यांवर काम करताना ताण - तणावाचे योग्य व्यवस्थापन करून नोकरी व कुटुंब यांच्यात योग्य समतोल राखण्याचे आवाहन केले. संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार म्हणाले, महावितरणच्या यंदाच्या अभियंता दिनाचे वैशिष्ट्य म्हणजे महावितरणच्या अभियंत्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत राज्यातील शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विद्युत सुरक्षा, हरित ऊजेर्चा अंगिकार आणि वीजबचतीचा जागर सुरू केला आहे. या मोहिमेच्या माध्यमातून आपले सगळे अभियंते कृतीतून अभियंता दिवस साजरा करून सामाजिक जबाबदारी देखील निभावत आहेत, असे ते म्हणाले. यावेळी कार्यकारी संचालक सर्वश्री परेश भागवत, भुजंग खंदारे, दिनेश अग्रवाल यांनी मनोगत व्यक्त करीत शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला मुख्य अभियंते मनीष वाठ, अंकुर कावळे, ज्ञानेश कुलकर्णी, मंगेश कोहाट, अशोक साळुंखे, संतोष सांगळे, प्रशांत दानोलीकर, पंकज तगलपल्लेवार, सुचित्रा गुजर, कविता घरत यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पाटणी यांनी केले व आभार मानले.

# भरती परीक्षा पद्धतीतील सुधारणांवर थेट संवाद

## उच्चस्तरीय समितीसमोर पूर्व विदर्भातील परीक्षार्थींनी मांडल्या अडचणी, अपेक्षा व सूचना





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षा पद्धतीत आवश्यक सुधारणा करण्यासह राज्यातील शासकीय भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित, विश्वासार्ह आणि उमेदवारकेंद्रीत करण्याच्या दृष्टीने बुधवारी पूर्व विदभार्तील विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधण्यात आला. सदर येथील जिल्हा नियोजन भवनात उच्चस्तरीय समितीच्या अध्यक्ष तथा अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा आणि इतर सदस्यांनी हितधारकांच्या अडचणी, अपेक्षा आणि सूचना जाणून घेतल्या. या संवाद कार्यक्रमाला पूर्व विदर्भातील स्पर्धा परीक्षा परीक्षार्थी, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था, कोचिंग क्लासेस, अभ्यासिका चालक व नागरिक उपस्थित होते.

राज्याचे पोलीस महासंचालक तथा समितीचे सदस्य सदानंद दाते, समितीचे सदस्य सचिव तथा पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, आयआयटी मुंबईचे प्रा. श्यामप्रसाद करगड्डे, नागपूर विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद प्रत्यक्ष तर इलेक्ट्रॉनिक्स, माहिती-तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह तसेच संघ लोकसेवा आयोगाचे माजी सदस्य एअर मार्शल अजित भोसले दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

राज्य सरकारने भरती परीक्षा पद्धतीमध्ये सुधारणा करण्यासाठी उच्चस्तरीय समिती गठित केली आहे. या समितीच्या माध्यमातून परीक्षा प्रक्रियेतील त्रुटी दूर करून उमेदवारांना अधिक सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने परीक्षा देता यावी, तसेच भरती प्रक्रियेवरील विश्वास अधिक दृढ व्हावा, यासाठी विविध घटकांकडून सूचना मागविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून नागपुरात विद्यार्थ्यांसोबत हा संवाद आयोजित करण्यात आला.

एमपीएससीच्या परीक्षा प्रक्रियेशी संबंधित विविध मुद्द्यांवर विद्यार्थ्यांनी आपली मते मांडली. परीक्षांचे वेळापत्रक, परीक्षा केंद्रांची उपलब्धता, अभ्यासक्रमातील बदल, प्रश्नपत्रिकेची गुणवत्ता, परीक्षा आयोजनातील पारदर्शकता, निकाल जाहीर करण्यास लागणारा कालावधी तसेच भरती प्रक्रियेतील विविध टप्प्यांबाबत विद्यार्थ्यांनी सूचना केल्या. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी आणि त्यांच्या अपेक्षाही यावेळी उच्चस्तरीय समितीसमोर मांडण्यात आल्या. ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा प्रक्रियेत सहभागी होताना येणाऱ्या अडचणी, परीक्षा केंद्रांचे नियोजन, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, उमेदवारांना वेळेवर माहिती उपलब्ध करून देणे आदी विषयांवरही विद्यार्थ्यांनी चर्चा केली. परीक्षा प्रक्रियेत कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक उपाययोजनां बाबतही विद्यार्थ्यांकडून सूचना घेण्यात आल्या.

उच्चस्तरीय समितीच्या सदस्यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या सूचना जाणून घेतल्या. केवळ प्रशासकीय पातळीवरून परीक्षा पद्धतीत बदल करण्याऐवजी परीक्षा देणाऱ्या उमेदवारांचे अनुभव आणि प्रत्यक्ष अडचणी समजून घेण्याच्या दृष्टीने हा संवाद महत्त्वाचा ठरला. नागपूरसह पूर्व विदभार्तील विविध भागांतून मोठ्या संख्येने विद्यार्थी या संवाद कार्यक्रमासाठी उपस्थित होते. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या तरुणांनी परीक्षा पद्धती अधिक कार्यक्षम आणि उमेदवारांना अनुकूल करण्यासाठी आपल्या सूचना मांडल्या. विद्यार्थ्यांनी मांडलेल्या विविध मुद्द्यांची उच्चस्तरीय समितीने नोंद घेतली.

## शासकीय वसतिगृह प्रवेशाकरीता ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत नागपूर विभागांतर्गत नागपूरमध्ये २५, वर्धा १० भंडारा ९ गोंदिया ८, चंद्रपूर ११, गडचिरोली ७ अशा एकूण ७० शासकीय वसतिगृहांची शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने अधिकृतपणे सुरू झाली आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विजाभज व इतर मागासवगार्तील विद्यार्थ्यांसाठी चालविण्यात येणाऱ्या शासकीय वसतिगृहाचे सन २०२६-२७ या शैक्षणिक सत्रातील व्यावसाईक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी अर्ज करण्याची १५ सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. परंतु सीईटी सेलचे व्यावसाईक अभ्यासक्रमाचे शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश देणे अद्यापही सुरु असून बहुतेक विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज सादर करता आलेले नाही विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून पालक आणि विद्यार्थ्यांच्या विनंतीनुसार शासनाने व्यावसायिक अभ्यासक्रमाचे विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेशासाठी मुदतवाढ दिलेली असून आता ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत अर्ज सादर करता येणार आहे. इच्छुक व पात्र लाभार्थ्यांनी नियोजित वेळेत https://hmasnew.mahait.org या पोर्टलद्वारे दिनांक ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज सादर करावे.

सुधारीत वेळापत्रकानुसार सन २०२६-२७ या शैक्षणिक सत्रासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमाचे वसतिगृह प्रवेशाचे अर्ज दि. ३०/९/२०२६ पर्यंत सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. ज्या विद्यार्थी व विद्यार्थीनींना शासकीय वसतिगृहात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्यांनी लवकरात लवकर वर दिलेल्या लिंकवर नियोजित वेळेत अर्ज सादर करावे. अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन प्रसाद कुळकर्णी, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग नागपूर यांनी केले आहे.

## प्राचार्य सुभाष खाकसे गुरुरत्न पुरस्काराने सन्मानित

### औदुंबर शिक्षण बहुउद्देशीय संस्थेचा देशपांडे सभागृहात शिक्षक दिनानिमित्त पुरस्कार सोहळा



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात गेल्या ३० वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करून विद्यार्थी आणि समाजासाठी विविध उपक्रम राबविणारे प्रियदर्शिनी शिक्षण महाविद्यालय, सोनेगाव, नागपूरचे प्राचार्य सुभाष खाकसे यांना शिक्षक दिनानिमित्त ह्यगुरुरत्न पुरस्कारह्ण देऊन सन्मानित करण्यात आले. औदुंबर शिक्षण बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने नागपूर येथील डॉक्टर वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित पुरस्कार सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला. प्राचार्य खाकसे यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील दीर्घकालीन कार्याची तसेच विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या विविध स्तुत्य उपक्रमांची दखल घेत त्यांना प्रशस्तीपत्र, भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. आयोजक संस्थेला त्यांनी केलेल्या विशेष सहकायार्चाही यावेळी गौरव करण्यात आला. या सोहळ्यात शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाना ३० शिक्षकांना 'गुरुरत्न पुरस्कार', तर १३० शिक्षकांना उत्कृष्ट शिक्षक प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ ८० वर्षीय डॉ. सुहासिनी वंजारी यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाला आमदार विकास ठाकरे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य अग्रवाल, माजी आमदार सुधाकर कोहळे, औदुंबर शिक्षण बहुउद्देशीय संस्थेच्या प्रमुख भाग्यश्री पवार, मिथिलेश ढवळे, निधीवनचे संचालक मनोज कुंभारे, वेद वेलचे संचालक चंद्रप्रकाश चतुर्वेदी, मानव विकास संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ जोध आदी मान्यवर उपस्थित होते. प्राचार्य सुभाष खाकसे यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. सतीश चतुर्वेदी, सचिव आभाताई चतुर्वेदी, वाडीचे नगराध्यक्ष नरेश चरडे, उपाध्यक्ष कल्पना सगदेव तसेच विविध सामाजिक, राजकीय व क्रीडा क्षेत्रातील प्रतिनिधींनी त्यांचे अभिनंदन केले.

## भक्तीमध्ये भाव आवश्यक : तालुका सेवाधिकारी शिवशंकर नागरे



**दै. सिंहवाणी वृत्त, श्रीरामपुर**

कलेने राजास,पैश्याने पत्नीस, कपटाने शत्रूस,सत्याने मित्रास, प्रेमाने पुत्रास,ज्ञानाने मोक्षास, व भावाने देवास वश करता येते, काष्ठात,पाषाणात,मातीत देव नाही भावातच देव आहे त्यामुळे भाव असेल तर सगळ्यात देव आहे,भाव म्हणजे चित्ताची एकाग्रता ती प्राप्त करण्याचे साधन सामुदायिक प्रार्थना आहे असे प्रतिपादन तालुका सेवाधिकारी शिवशंकर नागरे यांनी सामुदायिक प्रार्थनेत केले.

गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूर वतीने पुसद तालुक्यात ५१ ठिकाणी सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना उपक्रमास उस्फुर्त प्रतिसाद मिळत असून यावेळी गणेश चतुर्थीचे औचित्य साधून गुरुकुंज मोझरी रहिवाशी हल्ली मुक्काम मोतीनगर पुसद येथील मधुकर आजमिरे यांच्या निवासस्थानी सामुदायिक प्रार्थना व भजन संध्या घेण्यात आली.

यावेळी जीवन गौरव पुरस्कार प्राप्त ज्ञानेश्वर ताकतोडे, तालुका प्रचारक गजानन कवाने, कासार समाजभूषण मोहन नागपूरकर, अशोक भगत महाराज, सारंग अडसड, जितेंद्र किन्हेकर, मंडळाचे अध्यक्ष गणेश धर्माळे प्रामुख्याने उपस्थित होते.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते अधिष्ठान पूजन करून राष्ट्रसंतांचे सहवासी स्वर्गीय पांडुरंग आजमिरे व राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन पुष्पहार अर्पण करण्यात आला त्यानंतर ग्रामगीताचार्य स्मिता धमाळे यांच्या आदेशावरून शिस्तबद्ध सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली यावेळी प्रार्थनेचे महत्व विषद करतांना नागरे म्हणाले की भाव देवावर, संतांवर लावणे तेव्हढे सोपे नाही, संसारातील सर्व पदार्थांवरील चित्त काढणे अवघड आहे त्यासाठी राष्ट्रसंतांनी प्रथम मौन प्रार्थना सांगितली आमच्याकडे अहंभाव व द्वैतभाव आहे.

ज्ञानी व योगी यांच्याकडे सोहंभाव व अद्वैतभाव आहे तर भक्त व संतांकडे फक्त प्रेमभाव असतो म्हणून प्रेमभाव हृदयात रुजविण्यासाठी सामुदायिक प्रार्थना नितांत गरजेची आहे यावेळी त्यांनी शांतभाव, दास्यभाव, सख्यभाव, वात्सल्यभाव व माधुर्यभाव याविषयी सखोल माहिती दिली.

यानंतर भजनांचा बहारदार कार्यक्रम संपन्न झाला हार्मोनियम प्रा. आकाश ताविडे, यशवंत भगत,शिवलिंग अण्णा पटवे, तबला बाळू परतवाड, अनिल अस्वार, किशोर राऊत खंजिरी सुरेश कदम यांनी तर साथसंगत पुंडलिक भालेराव, पंजाब गडदे, श्यामराव देशमाने, सुभाष जाधव, कैलास मस्के, सतीश चव्हाण, गजानन गव्हाणकर, देवेश किन्हेकर, सागर केळकर, गजानन चव्हाण, रमेश चव्हाण, अमोल पवार, सुरज केळकर, सतीश चव्हाण, माधव पवार तानाजी गडधने दिगंबर चव्हाण, साहेबराव सरकटे, मुंगशी चव्हाण, सुधाकर कपटे महिला प्रतिनिधी कमल गडदे,मुक्ता काळबांडे, मीरा वानखेडे,विद्या पुरी, डॉ. देवश्री काळबांडे यांनी केली.

कार्यक्रमानंतर मधुकर आजमिरे व कुसुम आजमिरे यांच्या हस्ते मंडळाचे अध्यक्ष गणेश धर्माळे यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. नितीन आजमिरे व निशा आजमिरें, निर्जरा व अर्णव यांच्या हस्ते महाआरती होऊन अल्पोपहार, राष्ट्रवंदनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# सिनीयर भोसला पॅलेसमध्ये २९८ वर्षांची चांदीच्या महालक्ष्मीची परंपरा कायम

## इसवी सन १७२८ पासून अखंड परंपरा, यंदाही राजघराण्याच्या पारंपरिक पद्धतीने महालक्ष्मीची स्थापना



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिक वैभवाची साक्ष देणाऱ्या सिनीयर भोसला पॅलेसमध्ये यंदाही २९८ वर्षांची ऐतिहासिक महालक्ष्मी पूजनाची परंपरा भक्तिभावाने जपली जाणार आहे. हिंदवी स्वराज्याचे विस्तारक, नागपूर राज्याचे संस्थापक तथा सेनासाहेब सुभा श्रीमंत राजे रघुजी महाराज भोंसले यांच्या कालखंडापासून सुरू झालेली ही परंपरा आजही श्रद्धा आणि राजवैभवाची ओळख म्हणून अखंडपणे सुरू आहे. इसवी सन १७२८ पासून सुरू असलेल्या या परंपरेला यंदा २९८ वर्षे पूर्ण होत आहेत. सिनीयर भोसला पॅलेस येथे जुन्या अलंकारांनी जडविलेल्या चांदीच्या महालक्ष्मीची पारंपरिक पद्धतीने स्थापना करण्यात येणार आहे. त्यामुळे यंदाच्या महालक्ष्मी उत्सवाला ऐतिहासिक आणि धार्मिकदृष्ट्या विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. नागपूरच्या भोसले राजघराण्याला दीर्घ आणि समृद्ध ऐतिहासिक परंपरा लाभली आहे.

राजघराण्याच्या काळापासून विविध धार्मिक उत्सव, पूजाविधी आणि परंपरा जतन करण्याचे कार्य सातत्याने करण्यात आले. त्याच परंपरेतील एक महत्त्वाचा भाग म्हणजे सिनीयर भोसला पॅलेसमधील चांदीच्या महालक्ष्मीची स्थापना आणि पूजन होय. २९८ वर्षांची ही परंपरा केवळ धार्मिक विधी नसून नागपूरच्या इतिहासाशी जोडलेला सांस्कृतिक वारसा आहे. पिढ्यान्पिढ्या या परंपरेचे जतन करण्यात आले असून, आजच्या काळातही राजघराण्याच्या पारंपरिक पद्धतीने महालक्ष्मीची स्थापना केली जाते. जुन्या अलंकारांनी सुशोभित असलेल्या चांदीच्या महालक्ष्मीच्या मूर्तीचे विशेष आकर्षण भाविक आणि इतिहासप्रेमींसाठी कायम राहिले आहे. यंदा २०२६ मध्येही ही ऐतिहासिक परंपरा त्याच श्रद्धा आणि विधीपूर्वक पुढे नेण्यात येत आहे. त्यामुळे सिनीयर भोसला पॅलेसमधील महालक्ष्मी स्थापना सोहळ्याकडे नागपूरकरांचे विशेष लक्ष लागले आहे.

ऐतिहासिक राजवाडा, राजघराण्याची परंपरा आणि शेकडो वर्षांची धार्मिक श्रद्धा यांचा संगम या उत्सवाच्या माध्यमातून अनुभवता येणार आहे. महाराजा ऑफ नागपूर ट्रस्टचे मुख्य प्रवक्ता सारंग ढोक यांनी ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, १७२८ पासून चालत आलेली ही परंपरा आज २९८ वर्षांनंतरही त्याच श्रद्धेने आणि परंपरेच्या अनुषंगाने जपली जात आहे. नागपूरच्या ऐतिहासिक वारशातील या महत्त्वपूर्ण परंपरेचे जतन करणे ही सर्वांचीच जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले.



श्री बाल गणेश युवा उत्सव मंडळ, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर



सार्वजनिक गणेश मंडळाचे छायाचित्र, ओम गणेश मंडळ अंबिका नगर, दारव्हा, जि. यवतमाळ



लोकमान्य टिळक गणेश उत्सव मंडळ , गोविंद प्रभु नगर, राजापेठ बस स्टॉप, हुडकेश्वर, नागपूर



सन्मित्र नवयुवक गणेशोत्सव मंडळ, अजनी पोलीस ठाण्याजवळ, रमेश्वरी रोड, नागपूर



नवसाला पावनारा गणपती गणेशोत्सव मंडळ, भांडेप्लॉट चौक, उमरेड रोड, नागपूर



विश्वकर्मा नगरचा राजा गणेश उत्सव मंडळ, विश्वकर्मा नगर, गल्ली नंबर ७, नागपूर

# बाप्पांच्या भक्तीचा रंग, सिंहवाणी वृत्त संग

## आलास..?

वर्षभरात किती बदलून गेलास?...
किती जणांच्या प्रश्नांची उत्तरे
घेऊन आलास....
मागायचं काहीच नाही रे तुझ्याजवळ.....
काय ठेवलंस तू माझ्याजवळ?
लेकराचं सौख्य हवंय एका आईला...
पण हे कधी कळणार तुला.....?
तुज्या अवतीभोवती डीजे,
ढोलताशे आणि नाटकी वृत्ती....
आजूबाजूच्या हुकूमशाहीला
कधी देणार तू सुट्टी..?
बघतोस ना....! पेपर फुटीचे
जीवघेणे सोहळे?
MPSC परीक्षेच्या स्वप्नात चिरडले जात आहेत... सर्व छत्रपतींचे मावळे...
कित्येक लेकरांची हरल्याने आत्महत्या काळजाला चिरे देतायेत......
आई-बाबांचा आक्रन्द-आक्रोश
कसे सांभाळावेत?....
कित्येक घरे उध्वस्त झालीत....
लेकरांची स्वप्ने धुळीत गेलीत....
कशी अवस्था होणार उडत्या पक्षांची?...
पंखच कापण्यात येतात इथे लेकरांची.....
देशील का आतातरी निष्पाप
लेकरांना साथ....?
हताश लेकरांना हवाच रे
तुझ्या मदतीचा हात.....
बाकी तुला कळलंय..
मला काय बोलायचं.....
साठलेल्या काळजातलं
तुला कसं सांगायचं??...

**- वृषाली वानखडे,अमरावती**
**९९२१४२४१२५**



विशाल कळमकर, नागपूर



राहुलसिंह गीता दीपकसिहं जालंदर, उपासे ले-आउट, भानेगाव



लखन सुनीता सुरेंद्र श्रीवास्तव, जि. नागपूर



वैभव दांडेकर, स्नेह नगर, नागपूर



भाजप ओबीसी कामठी तालुकाध्यक्ष, जितेश भगत, संगीता जितेश भगत, भाऊ नितेश भगत, त्यांचे कुटुंबातील लहान सदस्य युक्ती, निष्का, सानवी, लाला हरांशू भगत आणि सहपरिवार बाप्पासोबत.
- रा. लोणारा लेआऊट, महादुला-कोराडी, जि. नागपूर




दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : श्रीमंत राजे मुधोजी भोसले यांनी सिंहवाणी वृत्त दैनिकातर्फे प्रकाशित 'आरती संग्रह-२०२६' या पुस्तिकेचे अवलोकन केले. यावेळी भारत क्रिडा मंडळचे पदाधिकारी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. नागपुरातील नामवंत व देखण्या एक अशा गणरायाची स्थापना भारत क्रिडा मंडळतर्फे दरवर्षी करण्यात येते. आकर्षक रोषणाई, नयनरम्य सजावट व शिस्तबद्ध नियोजन अशी या मंडळाची प्रसिद्धी आहे. लाखोंच्या संख्येने भाविक मंडळाच्या गणरायाचे आशिर्वाद घेता. (छायाचित्र : प्रविण गुंड, दै. सिंहवाणी वृत्त)

थोडक्यात

## न्यू नंदनवनच्या वुमेन्स कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्समध्ये द्विभाषिक वादविवाद स्पर्धेचे आयोजन गुरुवारी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

न्यू नंदनवन येथील वुमेन्स कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे गुरुवारी १७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता. 'Is the Gen-Z Cspsble to Lesd India?' या विषयावर वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. भारताचे नेतृत्व करण्यास ञील्ल-सक्षम आहे का? हा या वादविवादाचा मराठी विषय असून, हिंदीतही याच विषयावर विद्यार्थ्यांना आपले विचार मांडता येणार आहेत. महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये हा कार्यक्रम होणार आहे. डॉ. प्रभाताई सपकाळ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित या उपक्रमातून युवा पिढीचे नेतृत्वगुण, विचारक्षमता, सामाजिक जबाबदारी आणि देशाच्या भविष्यातील नेतृत्वाबाबतचे दृष्टिकोन व्यक्त होणार आहेत. विद्यार्थ्यांना समकालीन विषयावर आपली भूमिका प्रभावीपणे मांडण्याची संधी या वादविवादातून मिळणार आहे. तरी सर्वांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## महाविद्यालयात १०० दात्यांनी केले रक्तदान



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत भिवापूर महाविद्यालयात आयोजित रक्तदान शिबिरात १०० रक्तदात्यांनी रक्तदान केले. शहर व तालुक्यातील गणेशोत्सव मंडळ, भिवापूर पोलीस ठाणे, भिवापूर महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस), राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी), पोलीस पाटील संघटना, भिवापूर तालुका पत्रकार संघ, शांतता समिती तसेच आजी-माजी विद्यार्थी संघटनांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर घेण्यात आले. शिबिरात विविध गणेशोत्सव मंडळांतील युवक, पोलीस कर्मचारी, पोलीस पाटील संघटनेचे पदाधिकारी, पत्रकार संघाचे पदाधिकारी तसेच आजी-माजी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. जीवनज्योती ब्लड बँक, नागपूरच्या पथकाने रक्तसंकलन केले.

यावेळी तहसीलदार संजय राठोड, नगराध्यक्षा सुषमा श्रीरामे, ठाणेदार रविंद्र मस्कर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज, पत्रकार संघाचे अध्यक्ष पंढरी हिवसे, सचिव राजेश जांभळे, सोमनाळा प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. योगेश बोडखे, जीवनज्योती ब्लड बँकेचे डॉ. अभिजित मानकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील पदाधिकारी उपस्थित होते. एनएसएसचे कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीराज चव्हाण, डॉ. विनिता विरगंधम, डॉ. योगेश मोरे, डॉ. सुनील शिंदे, डॉ. आदित्य सारवे, एनएसएस स्वयंसेवक, एनसीसी विद्यार्थी तसेच विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी शिबिराच्या आयोजनासाठी परिश्रम घेतले.

## स्व. चंपतराव बुटे सर स्मृती दिनी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण

**दै. सिंहवाणी वृत्त, कोंढाळी**

सि.पि.अँड बेरार एज्युकेशन संस्था कोंढाळी द्वारा संचालित लखोटीया भुतडा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय कोंढाळी येथील प्रदीर्घ काल सेवारत स्व. चंपतराव बुटे सर माजी प्राचार्य यांचे २६ व्या स्मृतीदिनी दरवर्षीप्रमाणे लोणकरण राठी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सविता देशमुख, माजी प्राचार्य सुधीर बुटे, डॉ. सृजन बुटे, सौ. घाटे, महात्मे सर आदी उपस्थित होते.तसेच स्थानिक लखोटीया भुतडा विद्यालयात स्व. बुटे सरांना भावपुर्ण आदरांजली अर्पण करून विदयार्थ्यांना प्राचार्य कैलास थुल यांनी त्यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान व कार्याची माहिती दिली. याप्रसंगी उपमुख्याद्यापक मनोज ढाले, पर्यवेक्षक अर्चना ढाले, प्रिया धारपुरे, अंनता बुराण,रुपेश वादाफळे, मोहन धांडे, राहुल रक्षित, शैलेश चव्हाण, गायधने मॅडम अन्य मान्यवर उपस्थित होते.

## राष्ट्रीय पोषण महानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन तसेच ज्येष्ठांचा वाढदिवस



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

नागपूर जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने दरवर्षी राबविला जाणारा राष्टीय पोषण महा कार्यक्रमा निमित्त जेष्ठ नागरिकांचा वाढदिवस सोहळा भानेगाव येथे १६ सप्टेंबर बुधवारला मोठ्या उत्साहात संपन्न झाला. मोरया चौक वार्ड क्रमांक ३ उपासे ले आउट भानेगाव येथे चिचोली सर्कलच्या वतीने जेष्ठ नागरिकांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच शालिनी चवरे, चिचोली सर्कलच्या अंगणवाडी पर्यवेक्षिका मेघा भोयर, रविंद्र टापरे, प्रकाश वांडे आदि उपस्थित होते. गणेशोत्सव दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय पोषण महा कार्यक्रमा निमित्त आरोग्य व पोषण योजनांची माहिती देण्यात आली याप्रसंगी वाढदिवसा निमित्त जेष्ठ नागरिक ८५ वर्षीय गोदूबाई गजानन वांडे व ६६ वर्षीय नागोराव गोमाजी बेलसरे यांचा केक कापून टाळ मृदुंगाच्या गजरात वाढदिवस साजरा करण्यात आला यावेळी सरपंच शालिनी चवरे यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित महिलांना पोषण आहाराचे महत्व पटवून सांगण्यात आले. शिवाय आरोग्य योजनांचा लाभ याबाबत माहिती विषद करण्यात आली यावेळी दुर्गा भजन मंडळ बिना भानेगाव येथील महिला आवर्जून उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन पर्यवेक्षिका मेघा भोयर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेघा भोयर, अंगणवाडी सेविका दुर्गा डहाळे, मदतनीस मनिषा सोनेकर यांच्यासह अंगणवाडी सेविका यांनी सहकार्य केले.

# सेवा संकल्प अभियानातून वंचित घटकांना शासकीय योजनांचा लाभ द्यावा !

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे



**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या सेवा संकल्प अभियानातून विमुक्त जाती, भटक्या जमाती, स्थलांतरित समाज तसेच विविध वंचित घटकांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचवावा. संबंधित गटविकास अधिकारी आणि तहसीलदार यांच्याशी समन्वय साधून जिल्हास्तरीय यंत्रणेने अशा लाभार्थ्यांचा शोध घ्यावा व त्यांना आवश्यक शासकीय दाखले उपलब्ध करून द्यावेत, अशा सूचना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या.

सेवा संकल्प अभियानाच्या अंमलबजावणी संदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत महसूल मंत्री श्री. बावनकुळे बोलत होते. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

महसूल मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले की, प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवगार्तील, १०० युनिटपर्यंत वीज वापर असलेल्या कुटुंबांना लाभ देण्यासाठी सामाजिक न्याय तसेच आदिवासी विकास विभागाने पुढाकार घ्यावा. केंद्र शासनाच्या निधीव्यतिरिक्त आवश्यक असलेली तफावत जिल्हा नियोजन समिती अथवा सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास विभागाच्या निधीतून पूर्ण करण्याची कार्यवाही करावी. पात्र कुटुंबांना ही योजना संपूर्ण अनुदानावर उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने नियोजन करावे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत ज्या शिधापत्रिकाधारकांना धान्याची आवश्यकता नाही, त्यांना विश्वासात घेऊन त्यांच्या संमतीने व प्रचलित नियमांनुसार हे धान्य गरजू नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची कार्यवाही करावी. या उपक्रमाचाही सेवा संकल्प अभियानात समावेश करावा, असे निर्देशही त्यांनी दिले. वनहक्क दाव्यांवरील कार्यवाहीला गती देण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबवावा. त्यानुसार १७, १८ आणि १९ सप्टेंबर रोजी वनहक्क ग्राम समित्यांच्या बैठका घेऊन दाव्यांची छाननी व मंजुरीची कार्यवाही करावी. त्यानंतर ३० सप्टेंबर तसेच १ आणि २ ऑक्टोबर रोजी ग्रामसभा घेऊन दावे मंजूर करावेत. उपविभागीयस्तरीय समितीच्या बैठका ८ आणि ९ ऑक्टोबर रोजी, तर जिल्हास्तरीय समितीच्या बैठका १६ आणि १७ ऑक्टोबर रोजी घेण्यात याव्यात. आदिवासी विकास आणि महसूल विभागाने यासाठी एकत्रितपणे काम करावे. ज्या आदिवासी शेतकऱ्यांना वनहक्क पट्टे मिळाले आहेत, त्यांना सातबारा उतारे देण्याची कार्यवाहीही तातडीने करावी, असे श्री. बावनकुळे यांनी सांगितले.

अभियानांतर्गत पांदण रस्त्यांना क्रमांक देऊन त्यांचे ग्रीड तयार करावे. नवीन पांदण रस्त्यांचा शोध घेऊन पात्र कामांना प्रशासकीय मान्यता द्यावी आणि कामे सुरू करावीत. यामुळे पांदण रस्त्यांची अधिकृत नोंद तयार होऊन प्रत्येक रस्त्याला स्वतंत्र संकेतांक मिळेल. भविष्यात या रस्त्यांच्या विकासाचे नियोजन करणेही सुलभ होईल, असे त्यांनी नमूद केले.

१ जानेवारी २०११ पूर्वी रहिवास क्षेत्रात अथवा शासकीय जागेवर अतिक्रमण करून वास्तव्यास असलेल्या पात्र नागरिकांना प्रचलित शासन निर्णय आणि निकषांनुसार पट्टे देण्याचा कार्यक्रमही अभियानांतर्गत राबवावा. अभियानाची माहिती अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्थानिक समाजमाध्यम प्रभावकांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करावी, अशा सूचनाही महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी दिल्या.

मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सेवा संकल्प अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश दिले. वैयक्तिक लाभार्थी योजनांमधून पात्र नागरिकांना अधिकाधिक लाभ मिळवून द्यावा. विविध विभागांनी रिक्त पदांची स्थिती तपासून आवश्यक मागणीपत्रे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठवावीत. त्याचबरोबर बिंदुनामावली अद्ययावत करण्याची कार्यवाही प्राधान्याने पूर्ण करावी, असेही त्यांनी सांगितले.

बैठकीस महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी तसेच संबंधित विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि सचिव उपस्थित होते. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

## पोटा गावात पाणीटंचाईचे संकट, जल जीवन मिशन तीन वर्षापासून अपूर्ण

### डब्ल्यूसीएलचा पाणीपुरवठाही आठवडाभरापासून बंद

**दै. सिंहवाणी वृत्त, पोटा, ता. सावनेर**

शासनाच्या महत्त्वाकांक्षी जल जीवन मिशनचे काम पोटा गावात मागील सुमारे तीन वर्षांपासून सुरू असून अद्यापही अनेक नागरिकांना घरगुती पिण्याच्या पाण्याच्या नळजोडण्या मिळालेल्या नाहीत. यामुळे गावात पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली असतानाच, गावातील काही भागाला डब्ल्यूसीएलकडून होणारा पाणीपुरवठाही मागील सुमारे आठवडाभरापासून तांत्रिक कारणामुळे बंद असल्याने नागरिकांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत.

जल जीवन मिशनअंतर्गत पाण्याची टाकी बांधून जवळपास तीन वर्षांचा कालावधी उलटला आहे. मात्र, अद्याप अनेक घरांपर्यंत पिण्याच्या पाण्याची वैयक्तिक नळजोडणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे शासनाच्या योजनेचा लाभ नागरिकांना प्रत्यक्षात कधी मिळणार, असा प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. योजनेच्या पाईपलाईनसाठी गावातील विविध रस्ते खोदण्यात आले असून खोदकामानंतर रस्ते व्यवस्थित पूर्ववत करण्यात आलेले नसल्याने नागरिकांना ये-जा करताना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. तसेच मुख्य पाईपलाईन जमिनीत टाकून बराच काळ ठेवण्यात आल्याने तिच्या मजबुतीवर व गुणवत्तेवर परिणाम झाला असण्याची शक्यता ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे पाणीपुरवठा सुरू करण्यापूर्वी मुख्य पाईपलाईनची तांत्रिक तपासणी, गळती चाचणी व गुणवत्ता तपासणी करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, गावातील काही भागाला डब्ल्यूसीएलकडून करण्यात येणारा पाणीपुरवठा मागील सुमारे एक आठवड्यापासून खंडित झाला आहे. तांत्रिक कारणामुळे पाणीपुरवठा बंद झाल्याचे सांगण्यात येत असले तरी अद्याप तो सुरळीत न झाल्याने संबंधित भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी दूरवरून पाणी आणावे लागत आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुलांना याचा विशेष त्रास सहन करावा लागत आहे.

पाणीपुरवठा खंडित असताना जल जीवन मिशनची योजना अद्याप पूर्ण क्षमतेने सुरू झालेली नसल्याने पोटा गावातील नागरिकांसमोर पिण्याच्या पाण्याचे गंभीर संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी तातडीने दखल घेऊन डब्ल्यूसीएलचा तांत्रिक बिघाड दूर करून पाणीपुरवठा पूर्ववत करावा. तसेच, पाणीपुरवठा सुरळीत होईपर्यंत संबंधित भागातील नागरिकांसाठी तात्पुरत्या स्वरूपात टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



याशिवाय जल जीवन मिशनच्या पाण्याच्या टाकीच्या बांधकामाच्या गुणवत्तेबाबतही ग्रामस्थांनी प्रश्न उपस्थित केले असून, कामाची तांत्रिक तपासणी करण्यात यावी, अशी मागणी आहे. जल जीवन मिशनचे अपूर्ण काम तातडीने पूर्ण करून प्रत्येक घरापर्यंत पिण्याचे पाणी पोहोचवावे, पाईपलाईन व टाकीच्या कामाची गुणवत्ता तपासावी आणि खोदलेले रस्ते पूर्ववत करावेत, अशी मागणी पोटा येथील ग्रामस्थांनी केली आहे.

## पारशिवनी भूमी अभिलेख कार्यालयाला उपअधीक्षकच नाही, प्रभारी राजवटीने शेतकरी हैराण

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागांतर्गत येणारे अत्यंत महत्त्वाचे कार्यालय म्हणून भूमी अभिलेख कार्यालयाकडे पाहिले जाते. शेतजमिनीची मोजणी, हद्द निश्चिती, नकाशे व सात-बारा उताऱ्यांचे जतन आणि मालकी हक्काचे कायदेशीर दस्तऐवज अद्ययावत ठेवण्याचे काम या कार्यालयाचे आहे. मात्र, पारशिवनी येथील भूमी अभिलेख कार्यालयाला गेल्या दोन महिन्यांपासून पूर्णवेळ उपअधीक्षक नसल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांची कामे खोळंबली आहेत.

प्राप्त माहितीनुसार, येथील उपअधीक्षकांची दोन महिन्यांपूर्वी बदली झाली. त्यानंतर या कार्यालयाचा अतिरिक्त प्रभार रामटेक येथील उपअधीक्षकांकडे देण्यात आला आहे. प्रभारी अधिकारी आठवड्यातून केवळ बुधवारीच पारशिवनी येथे उपलब्ध होत असल्याने धोरणात्मक निर्णय, अंतिम स्वाक्षऱ्या आणि मोजणी मंजुरीची सर्व कामे रखडली आहेत.




### कार्यालयाचे महत्त्व आणि रखडलेली कामे

भूमी अभिलेख कार्यालय हे शेतकरी आणि जमीनधारकांसाठी कणा आहे. या कार्यालयामार्फत शेतजमिनीची हद्द कायम मोजणी, पोटहिस्सा मोजणी करून नवीन उपविभाग तयार करणे, न्यायालयाच्या आदेशानुसार विशेष मोजणी, बांधावरील अतिक्रमण तपासणीसाठी मोजणी ही कामे केली जातात. तसेच गाव नकाशे, गट नंबर नकाशे, शहर भूमापन नकाशे, जुने फेरफार रेकॉर्ड जतन करणे आणि डिजिटल इंडिया भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत स्कॅनिंगचे काम येथे होते.

नागरिकांना कायदेशीर नकाशे, फेरफार उताऱ्यांच्या प्रती आणि डिजिटल स्वाक्षरी असलेले उतारे देणे, तसेच शासकीय प्रकल्पांसाठी मोजणी करून आकडेवारी सादर करणे, ही कामेही याच कार्यालयातून होतात. सध्या दैनंदिन अर्ज स्वीकारले जात असले तरी अंतिम आदेश, मोजणी अहवालावर स्वाक्षरी आणि कायदेशीर निर्णय घेण्यासाठी शेतकऱ्यांना बुधवारची वाट पाहावी लागत आहे. त्यामुळे महसूल कार्यालयातील नोंदींना उशीर होत असून शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

### शेतकऱ्यांची मागणी

पेरणी आणि खरेदी-विक्रीच्या हंगामात जमिनीच्या मोजणीला आणि हद्द कायमला अत्यंत महत्त्व असते. अधिकारी वेळेवर उपलब्ध नसल्याने वाद वाढण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. पारशिवनी कार्यालयासाठी स्वतंत्र आणि पूर्णवेळ उपअधीक्षक नसल्याने कर्मचाऱ्यांचाच बोलबाला असल्याने शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. साहेब नसल्याने शेतकरी आल्यापावले परत जातात. मंत्री साहेबांनी दखल घेऊन पुर्णवेळ उपअधिक्षक पद तत्काळ नियुक्त करावा, अशी मागणी तालुक्यातील शेतकरी व नागरिकांकडून होत आहे.

## खेडेपार शाळा व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन

### शिवकुमार लिल्हारे अध्यक्ष, तर माधुरीताई डहारे उपाध्यक्षपदी निवड



**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

जि.प. हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळा खेडेपार येथे शाळा व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन करण्यात आले. ग्रामपंचायत खेडेपारचे सरपंच महेश लिल्हारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत नवीन शाळा व्यवस्थापन समितीची निवड प्रक्रिया पार पडली. यावेळी शिवकुमार लिल्हारे यांची समितीच्या अध्यक्षपदी, तर माधुरीताई शेषलाल डहारे यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. समितीच्या सदस्यपदासाठी विद्या बसेना, कमलेश दमाहे, किरण लिल्हारे, पुनाराम नागपुरे, युवराज मरसकोल्हे, श्यामरतन सरिये, बेदराम डहारे, सीमा सिहोरे, सुनीता लिल्हारे आदींची निवड करण्यात आली. शाळेच्या शैक्षणिक विकासाला चालना देणे, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी विविध उपक्रम राबविणे तसेच शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पालक, शिक्षक व ग्रामस्थांच्या सहभागातून प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्यांचे यावेळी अभिनंदन करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक एस.बी.दमाहे, पदवीधर शिक्षिका उत्तरा फरदे, आर.एच.लिल्हारे, वी.एस. येशनसुरे, एम. एम.राजगिरे, एम.एन.निंबार्क ,एस.एम.सारोख या शिक्षकांनी नवीन समितीचे स्वागत करून पुढील कायासाठी शुभेच्छा दिल्या.

## भरधाव इनोव्हाने मॉर्निंग वॉक करणाऱ्या ७४ वर्षीय वृद्धाला चिरडले, आरोपी चालकाला न्यायालयाकडून जामीन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भरधाव वेगाने वाहन चालविताना नियंत्रण सुटून मॉर्निंग वॉक करणाऱ्या ७४ वर्षीय वृद्धाला धडक देऊन त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या आरोपी वाहन चालकास जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर यांनी जामीन मंजूर केला. ही घटना ३० ऑगस्ट २०२६ रोजी पहाटे जपानी गार्डन परिसरात घडली. मृत व्यक्तीचे नाव कैलाश सौंधिया असे आहे.

नेहमीप्रमाणे ते सकाळी सुमारे ६ वाजताच्या सुमारास मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडले होते. त्याचवेळी जपानी गार्डनच्या बाजूने आलेली टोयोटा इनोव्हा रवश भरधाव वेगाने येऊन नियंत्रणाबाहेर गेली आणि फुटपाथवर धडकली. या अपघातात कैलाश सौंधिया यांना वाहनाची जोरदार धडक बसली. गंभीर दुखापतींमुळे त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या घटनेनंतर पोलिसांनी वाहनचालक तुषार काकडे याला घटनास्थळावरून ताब्यात घेतले. याप्रकरणी गिट्टीखदान पोलिसांनी ३० ऑगस्ट २०२६ रोजी, एफआयआर क्रमांक ६२१/२०२६ दाखल केला. आरोपी विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०५ व २८१ तसेच मोटार वाहन कायद्यातील कलम १८४ व १८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीच्या वतीने अँड. भावेश सुगंध आणि अड. यश ज्ञानचंदानी यांनी जिल्हा व सत्र न्यायालयात बाजू मांडली.

आरोपी मद्याच्या प्रभावाखाली होता किंवा नाही, याची तपासणी व त्यासंदर्भातील पुरावे खटल्याच्या सुनावणीदरम्यान तपासले जाऊ शकतात, असा युक्तिवाद त्यांनी केला. तसेच, प्रकरणातील तपास जवळपास पूर्ण झाला असून आरोपीकडून आणखी कोणतीही महत्त्वाची वस्तू अथवा पुरावा जप्त करणे बाकी नसल्याचे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. आरोपीचा मृत व्यक्तीला ठार मारण्याचा कोणताही हेतू नव्हता, असेही बचाव पक्षाच्या वकिलांनी नमूद केले. या आधारावर आरोपी तुषार काकडे याला जामीन मंजूर करण्याची मागणी त्यांनी न्यायालयाकडे केली. आणि जामिन मंजूर सुद्धा झालेला आहे.

शब्दवेली

बाप्पाच्या उत्सवाचा रंग, सिंहवाणी वृत्त संग...

दैनिक सिंहवाणी वृत्त

७ दिनांक : गुरुवार, १७ सप्टेंबर २०२६

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com Epaper : epaper.sinhvani.com

# सेवा संकल्पातून लोकाभिमुख प्रशासन
# महिनाभराचा उपक्रम, प्रशासन जनतेच्या दारी

प्रवीण टाके

'सेवा परमो धर्मः' ही केवळ एक उक्ती नाही, तर सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याची भावना आहे. शासनाच्या योजना तयार होतात, निर्णय घेतले जातात; मात्र त्यांचा खरा अर्थ तेव्हा अधोरेखित होतो, जेव्हा त्या योजनांचा लाभ गावातील सामान्य कुटुंबापर्यंत, शेतकऱ्यांपर्यंत, महिलांपर्यंत, विद्यार्थ्यांपर्यंत आणि गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचतो. प्रशासन १७ सप्टेंबरपासून अशाच एका लोकाभिमुख अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सज्ज झाले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, नागरिकांचा सहभाग वाढविणे, त्यांच्या सहभागाचे कौतुक करणे आणि शासन नागरिकांच्या पाठीशी असल्याची भावना दृढ करणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संवैधानिक पदावरील कारकीदीर्ला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने, त्यांच्या कार्यकाळात 'सेवा परमो धर्मः' या भावनेतून सामान्य नागरिकांपर्यंत सेवा पोहोचविण्याच्या प्रयत्नांना अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून विविध सेवा उपक्रम राबविले जात आहेत. याच भावनेतून महाराष्ट्र शासनाने १७ सप्टेंबर २०२६ ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. हे अभियान म्हणजे केवळ कार्यक्रमांची मालिका नाही. सरकारी सेवा आणि योजना सामान्य माणसाच्या अधिक जवळ नेण्याचा हा प्रयत्न आहे.

### कार्यालयाच्या फेऱ्या कमी होणार

गावातील एखाद्या नागरिकाला प्रमाणपत्र हवे असते, शेतकऱ्याला जमिनीची नोंद अद्ययावत करायची असते किंवा एखाद्या कुटुंबाला सरकारी योजनेचा लाभ घ्यायचा असतो. अशा वेळी अनेकदा विविध कार्यालयांमध्ये जावे लागते. सेवा संकल्प अभियानात ही प्रक्रिया शक्य तितकी सोपी करण्यावर भर देण्यात आला आहे.प्रत्येक तालुक्यात 'सेवा सेतू' शिबिरे आयोजित करून विविध शासकीय योजनांचे लाभ पात्र नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. म्हणजेच अनेक सेवा एकाच ठिकाणी मिळण्याची सुविधा निर्माण होणार आहे.

### शिबिरांच्या माध्यमातून कामांना गती

या शिबिरांमध्ये फेरफार नोंदींचा निपटारा, स्वामित्व सनद, शेतपाणंद रस्ते, शिधापत्रिका, नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र, वनहक्क दावे, नळजोडणी, वीज जोडणी, दिव्यांग प्रमाणपत्र, विवाह नोंदणी, आधार, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, शिकाऊ वाहनचालक परवाना, महिला बचत गट नोंदणी, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र तसेच ७/१२ आणि ८-अ नोंदी अद्ययावत करण्यासारख्या सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

सोप्या भाषेत सांगायचे तर ज्या सेवेसाठी नागरिकाला वारंवार कार्यालयात जावे लागते, ती सेवा शक्य तितकी त्याच्या जवळ नेण्याचा प्रयत्न या अभियानातून होणार आहे.




### गावात सेवा, गावातच समाधान

सेवा संकल्प अभियानाचा विशेष भर ग्रामीण भागावरही आहे. प्रत्येक गावात आणि वॉर्डात स्थानिक गरजेनुसार 'सेवा माझे योगदान' उपक्रम राबविण्यात येणार आहेत. गावातील युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींना यात सहभागी करून घेतले जाणार आहे.

गाव स्वच्छ ठेवणे, नदीघाट आणि बारवांची स्वच्छता करणे, वृक्षारोपण करणे, रक्तदान करणे, आरोग्य तपासणी शिबिर घेणे, प्लास्टिकमुक्तीची जनजागृती करणे, जलसंधारण करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, रस्ते सुरक्षेबाबत जागृती करणे अशा अनेक उपक्रमांना या माध्यमातून चालना मिळणार आहे.

### शासनाची सेवा, समाजाचा सहभाग

याचा अर्थ एकच शासनाची सेवा आणि समाजाचा सहभाग एकत्र आला, तर गावाचा विकास अधिक वेगाने होऊ शकतो.ग्रामीण भागातील नागरिकांसाठी जमीन आणि महसूल विषयक कागदपत्रे अत्यंत महत्त्वाची असतात. फेरफार नोंदी, ७/१२, ८-अ, स्वामित्व सनद, वनहक्क दावे यांसारख्या बाबी अनेकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेल्या आहेत.

वनहक्क दाव्यांच्या बाबतीत नवीन दावे स्वीकारणे, जुन्या दाव्यांमधील दुरुस्ती करणे आणि पात्र दावे निकाली काढण्याची प्रक्रिया अभियानाच्या कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.म्हणूनच सेवा संकल्प अभियानाचा लाभ गावातील नागरिकांनी आपल्या दैनंदिन गरजांशी जोडून पाहणे महत्त्वाचे आहे.

### अंगणवाडीतही सेवा उत्सव

लहान मुले आणि त्यांच्या मातांसाठीही या अभियानांतर्गत विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. 'अंगणवाडी उत्सव' अंतर्गत अंगणवाडी केंद्रांवर मुलांसोबत मातांना आमंत्रित करून महिलांना आरोग्य आणि पोषणविषयक योजनांची माहिती देण्यात येणार आहे. मुलांसाठी मनोरंजनाचे कार्यक्रम, फळे व मिठाईचे वाटप आणि अंगणवाडी सेविका, मदतनीस व आशा कार्यकर्त्यांचा सन्मान करण्याची तरतूद आहे. ग्रामीण कुटुंबाच्या आरोग्याचा पाया मजबूत करण्यासाठी आई आणि बालकाचे आरोग्य महत्त्वाचे आहे. त्यामुळे अंगणवाडी उत्सव हा केवळ एक कार्यक्रम न राहता आई, बालक आणि पोषण यांना जोडणारा उपक्रम ठरतो.

### गावातील तरुणांच्या कल्पनांना नवे व्यासपीठ

आज ग्रामीण भागातील तरुणांकडे अनेक चांगल्या कल्पना आहेत. शेती, पाणी, शिक्षण, आरोग्य, रोजगार, तंत्रज्ञान अशा अनेक क्षेत्रांत ते नवे प्रयोग करू शकतात. योग्य संधी आणि व्यासपीठ मिळाले, तर या कल्पना मोठ्या बदलाचे कारण ठरू शकतात.सेवा संकल्प अभियानात राज्यातील युवा, विद्यार्थी, स्टार्टअप्स, व्यावसायिक, कॉर्पोरेट इनोव्हेटर्स आणि ग्रामीण भागात नवे प्रभावी उपाय विकसित करणाऱ्या व्यक्तींना जोडण्यासाठी 'इनोव्हेशन चॅलेंज' आयोजित करण्यात येणार आहे. शैक्षणिक संस्था, स्टार्टअप नेटवर्क, इन्क्युबेशन सेंटर आणि खासगी कंपन्यांचाही सहभाग घेतला जाणार आहे. निवडलेल्या उत्कृष्ट कल्पनांना तज्ज्ञांसमोर सादरीकरणाची संधी मिळणार आहे.

### विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा

देशाचे भविष्य वर्गखोल्यांमध्ये घडत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनाही या अभियानाशी जोडण्यात आले आहे. 'विकसित भारत' आणि 'मुलांच्या स्वप्नातील भारत' या विषयांवर चित्रकला आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांच्या कल्पना आणि स्वप्नांना व्यासपीठ देण्याचा हा प्रयत्न आहे.आजचा विद्यार्थी उद्याचा नागरिक आहे. त्यामुळे विकसित भारताची संकल्पना विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्यासोबतच त्यांच्या कल्पना आणि स्वप्नांना भविष्यातील भारताच्या उभारणीशी जोडण्याचा हा प्रयत्न आहे.

### लाभार्थ्यांच्या घरापर्यंत 'आशीर्वादाचा दिवा'

शासकीय योजनेचा लाभ मिळालेल्या नागरिकाच्या घरापर्यंत जाऊन 'आशीर्वादाचा दिवा' प्रज्वलित करण्याचा उपक्रमही या अभियानात आहे. विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांच्या घरी जाऊन दीप प्रज्वलित करणे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. सरकारची योजना कागदावर असते; पण तिचा लाभ जेव्हा एखाद्या कुटुंबाच्या घरात पोहोचतो, तेव्हा त्या योजनेला खरा अर्थ प्राप्त होतो. त्या समाधानाच्या क्षणाला जोडणारा हा उपक्रम आहे.

### बदलाची गोष्ट आता गावागावातून

एखाद्या शेतकऱ्याला योजनेचा लाभ मिळाल्याने शेतीत बदल झाला, एखाद्या महिलेला बचत गटामुळे आर्थिक आधार मिळाला, एखाद्या विद्यार्थ्याला संधी मिळाली किंवा एखाद्या कुटुंबाचे जीवनमान सुधारले, तर ही केवळ एका व्यक्तीची गोष्ट राहत नाही. ती इतरांसाठीही प्रेरणा बनते. म्हणूनच 'बदलाची गोष्ट' या उपक्रमातून विविध योजनांमुळे नागरिकांच्या जीवनात झालेला सकारात्मक बदल त्यांच्या स्वतःच्या शब्दांत समाजासमोर आणला जाणार आहे. त्यांच्या अनुभवांचे व्हिडिओ आणि रील्सच्या माध्यमातून संकलन करण्यात येणार आहे.

### सेवा संकल्पाची खरी दिशा

सेवा संकल्प अभियानातील प्रत्येक उपक्रमामागे वेगवेगळी उद्दिष्टे असली, तरी त्यामागची भावना एकच आहे. सामान्य नागरिकाला सेवा मिळविण्यासाठी अधिक सोपे, सुलभ आणि जवळचे वातावरण निर्माण करणे.१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या काळात प्रशासन आणि सामान्य नागरिक यांच्यातील संवाद व लोकसहभाग वाढविणारा ठरणार आहे. योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांना मिळावा, शासन अधिक लोकाभिमुख व्हावे आणि शासनाच्या योजना सामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. 'माहितीअभावी पात्र व्यक्ती वंचित राहता कामा नये', ही या उपक्रमामागील प्रमुख भूमिका आहे. या अभियानाला नागरिकांचा मिळणारा प्रतिसाद त्याच्या यशासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

-उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
९७०२८५८७७७

# प्रत्येक रुग्णाला उत्तम आरोग्यसेवा आणि सुरक्षा मिळवणे कितपत सहज

**जागतिक रुग्ण सुरक्षा दिन विशेष**



डॉ. प्रितम भि. गेडाम
नागपूर

अलीकडेच एका प्रसिद्ध वृत्तपत्रात बातमी वाचली. राजस्थानमधील कोटा येथील १५ वर्षीय तन्वी परियानी ही गंभीर हृदयरोगाने ग्रस्त होती. वर्ष २०१४ पासून तब्बल १३ वर्षे दिल्लीतील एम्स रुग्णालयात शस्त्रक्रियेची वाट पाहत असताना १ सप्टेंबर रोजी तिचे निधन झाले. या १३ वर्षांच्या कालावधीत तन्वीच्या कुटुंबाचे लाखो रुपये खर्च झाले. शस्त्रक्रियेसाठी नवीन नवीन तारखा मिळत राहिल्या; मात्र शस्त्रक्रिया झाली नाही. तन्वीच्या वडिलांनी रुग्णालयावर दोषारोप केला आणि म्हटले की, 'मी गरीब आहे, पण मुलीला न्याय मिळवून देण्यासाठी लढत राहील.' तन्वीच्या मृत्यूनंतर एम्सने उपचार आणि मृत्यूच्या प्रकरणाचा आढावा घेण्यासाठी चौकशी समिती स्थापन केली आहे. भारत हा खेडेगावांनी वसलेला देश आहे, कारण मोठी लोकसंख्या ग्रामीण भागात राहते, मात्र ग्रामीण भागात दररोज घडणाऱ्या अनेक हृदयद्रावक घटना मानवतेला लाजवतात.

मध्य प्रदेशातील बालाघाटच्या आदिवासी भागात ३० हून अधिक मुलांच्या मृत्यूच्या बातमीने अस्वस्थ केले; अशा दुःखद घटनांमुळे आरोग्य सुविधा सुरक्षा आणि प्रशासनावर थेट प्रश्नचिन्ह निर्माण होतो.

अलीकडेच तेलंगणातील कोलामगुडा या ग्रामीण भागात सात महिन्यांची गर्भवती महिला गंभीर आजारी पडली. खराब रस्ता आणि कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्यामुळे गावातील लोकांनी कामचलाऊ स्ट्रेचर तयार केले आणि उफाळून वाहणारी नदी पार करून त्या महिलेला प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंत पोहोचवले. ग्रामीण भागात अशा अनेक घटना दररोज घडतात. अनेक भागांत आरोग्य केंद्रापर्यंत पोहोचण्यासाठी साधे रस्तेही उपलब्ध नाहीत. वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे दरवर्षी मोठ्या संख्येने लोकांना आपला जीव गमवावा लागतो. ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रांमध्ये पुरेशा आरोग्य कर्मचाऱ्यांची कमतरता कायमच असते आणि अत्याधुनिक सेवा-सुविधा तर जणू एक स्वप्नच आहेत.

दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी जगभरात रुग्णांना उत्तम आरोग्य सुविधा आणि सुरक्षितता मिळावी यासाठी जागतिक रुग्ण सुरक्षा दिन साजरा केला जातो. यावर्षी २०२६ ची थीम 'गैर-संसर्गजन्य रोगांसाठी सुरक्षित आरोग्यसेवा' अशी आहे आणि त्याचा अधिकृत नारा 'जीवनासाठी सुरक्षित आरोग्यसेवा' असा आहे. भारतात रुग्णांच्या सुरक्षिततेसमोर आरोग्यसेवेच्या मूलभूत पायाभूत सुविधांवर असलेला अत्यधिक ताण, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची मोठी कमतरता, अत्याधुनिक संसाधनांचा अभाव आणि रुग्ण-आरोग्यसेवा प्रदाता यांच्यातील उच्च प्रमाण यांसारखी मोठी आव्हाने आहेत. आपल्या देशात लोकसंख्येच्या तुलनेत आरोग्य चिकित्सकांची मोठी कमतरता आहे. महानगरे आणि शहरांमध्ये पंचतारांकित हॉटेल्ससारखी नवीन खाजगी रुग्णालये उघडली जात असून, सरकार वैद्यकीय सेवा बळकट करण्यावरही भर देत असले तरी, झपाट्याने वाढणारे आजार देशाच्या लोकसंख्येवर आपली पकड वेगाने घट्ट करत आहेत. यामध्ये गरीब आणि मध्यमवर्गीय, विशेषतः ग्रामीण भागातील रुग्णांना मोठा संघर्ष करावा लागतो. रुग्णवाहिकेसाठी पैसे नसल्यामुळे आपल्या प्रियजनांचे मृतदेह खांद्यावर वाहून नेणाऱ्या



कुटुंबियांना आपण अनेक वेळा पाहिले आहे.

सॅम्पल रजिस्ट्रेशन सिस्टम स्टॅटिस्टिकल रिपोर्टनुसार, २०२४ मध्ये झालेल्या एकूण मृत्यूंपैकी जवळपास निम्मे मृत्यू कोणत्याही प्रशिक्षित व्यावसायिकाच्या वैद्यकीय देखरेखीशिवाय झाले. २०२४ मध्ये अशा मृत्यूंचे प्रमाण ४५.५ टक्के होते, जे २०२० मध्ये नोंदवलेल्या १८ टक्क्यांपेक्षा दुप्पटपेक्षाही अधिक आहे. २०२१ पासून हे प्रमाण एकूण मृत्यूंच्या जवळपास निम्मे राहिले आहे. या श्रेणीत अशा लोकांचा समावेश होतो, ज्यांना मृत्यूच्या वेळी कोणतीही वैद्यकीय मदत मिळाली नाही किंवा ज्यांची काळजी केवळ अप्रशिक्षित व्यक्तीकडून घेण्यात आली. २०२४ मध्ये प्रशिक्षित वैद्यकीय सेवेशिवाय झालेल्या मृत्यूंचे प्रमाण ग्रामीण भागात ४८.९ टक्के, तर शहरी भागात ३६.१ टक्के होते.

जागतिक आरोग्य संघटनेनुसार, आरोग्यसेवा घेत असताना प्रत्येक १० रुग्णांपैकी जवळपास एका रुग्णाला हानी पोहोचते आणि असुरक्षित आरोग्यसेवेमुळे दरवर्षी ३० लाखांहून अधिक मृत्यू होतात. कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये असुरक्षित आरोग्यसेवेमुळे प्रत्येक १०० लोकांपैकी ४ जणांचा मृत्यू होतो. ५० टक्क्यांहून अधिक हानी टाळता येऊ शकते. या हानीपैकी निम्मी हानी औषधांशी संबंधित समस्यांमुळे होते. काही अंदाजानुसार, प्राथमिक आणि बाह्यरुग्ण आरोग्यसेवा व्यवस्थेत प्रत्येक १० रुग्णांपैकी ४ रुग्णांना हानी पोहोचते, तर यापैकी ८० टक्क्यांपर्यंत हानी टाळता येऊ शकते. उदाहरणार्थ औषधांशी संबंधित चुका, असुरक्षित शस्त्रक्रिया प्रक्रिया, आरोग्यसेवेशी संबंधित संसर्ग, तपासणी किंवा निदानातील चुका, प्रेशर अल्सर, रुग्णाची चुकीची ओळख, असुरक्षित रक्त संक्रमण आणि व्हेनस थ्रोम्बोएम्बोलिझम यांचा समावेश होतो. रुग्णाला होणाऱ्या हानीमुळे जागतिक आर्थिक विकासात घट होऊ शकते. जागतिक स्तरावर या हानीची अप्रत्यक्ष किंमत दरवर्षी ट्रिलियन अमेरिकी डॉलर इतकी असते.

हेल्थव्हॉइस - मेडिसर्कल मीडिया व्हेंचर जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनानुसार, जगातील सर्वात मोठ्या आणि सर्वाधिक गुंतागुंतीच्या आरोग्यसेवा व्यवस्थांपैकी एक असलेल्या भारतावर या समस्येचा मोठा भार आहे. १८व्या वार्षिक मेडिकोलीगल रिव्ह्यूनुसार, केवळ २०२५ मध्ये भारतात वैद्यकीय निष्काळजीपणाची ६५,००० प्रकरणे नोंदवली गेली. अशा प्रकरणांमधून समोर येणारे धोके ही एक मोठी जागतिक समस्या दर्शवतात. जागतिक आरोग्य संघटनेचे म्हणणे आहे की, असुरक्षित वैद्यकीय सेवेमुळे दरवर्षी अंदाजे १३.८ कोटी रुग्णांना हानी पोहोचते.

आजकाल प्रत्येक क्षेत्रात बनावट उत्पादनांची भरमार आहे आणि औषध बाजारही त्याला अपवाद नाही. बनावट औषधांचे साम्राज्य वेगाने वाढत आहे. बनावट औषधांच्या नेटवर्कमध्ये आणि उत्पादनात वेगाने होत असलेल्या वाढीमुळे बनावट औषधे रोखण्यासाठीच्या पॅकेजिंगची जागतिक बाजारपेठ २०२६ मध्ये १२९ अब्ज अमेरिकी डॉलर पर्यंत पोहोचली आहे. महाराष्ट्रातील सरकारी रुग्णालयांमध्ये बनावट औषधांचा साठा आढळल्याच्या घटनाही घडल्या आहेत. काही काळापूर्वीच शासकीय नागपूर मेडिकल महाविद्यालय व रुग्णालयातही अशी बाब समोर आली होती. एक काळ असा होता की, चिकित्सक हाताची नाडी, डोळे आणि जीभ पाहूनच आजाराचे निदान करत असत आणि क्वचितच तपासण्या करायचे. मात्र आज रुग्णालयात गेल्यानंतर बहुतांश वेळा प्रथम विविध तपासण्या लिहून दिल्या जातात आणि त्यानंतर अहवाल आल्यानंतर उपचार केले जातात. अनेक वेळा कोणती तपासणी कुठे करायची आणि औषधे कुठून घ्यायची, हे देखील पूर्वीच ठरलेले असते. चिकित्सक सरकारी रुग्णालयांमध्ये सेवा देण्याऐवजी खासगी रुग्णालयांमध्ये काम करण्याला प्राधान्य देतात.

बहुतांश पाश्चिमात्य आणि विकसित देशांमध्ये चिकित्सकांना कठोर कायद्यांतर्गत पूर्ण प्रामाणिकपणे आणि कौशल्याने आरोग्य क्षेत्रात काम करावे लागते. रुग्णाच्या उपचारादरम्यान झालेल्या अगदी छोट्याशा चुकीसाठी किंवा निष्काळजी पणासाठीही चिकित्सकाला जबाबदार धरले जाते. त्यांचा परवाना जप्त केला जातो आणि शिक्षा केली जाते. मात्र आपल्या देशात उपचारादरम्यान होणाऱ्या निष्काळजीपणाबाबत अशी पारदर्शक जबाबदारी निश्चित केलेली दिसून येत नाही.

इतर क्षेत्रांप्रमाणेच आरोग्य क्षेत्रातही फसवणूक, भ्रष्टाचार, बनावटगिरी आणि अनैतिकतेच्या घटनांच्या बातम्या पाहायला आणि ऐकायला मिळतात. सोशल मीडियाच्या युगात तर या क्षेत्रातील व्हिडिओ दररोज व्हायरल होताना दिसतात. मात्र जगात हे एकमेव असे क्षेत्र आहे, जिथे चिकित्सकांना अमूल्य जीव वाचवणाऱ्या देवदूताचा दर्जा दिला जातो.

प्रत्येक रुग्णाला उत्तम आरोग्य सुविधा अत्यंत सहजपणे मिळायला हव्यात. केवळ पैशांची कमतरता असल्यामुळे कोणत्याही व्यक्तीला आपला जीव गमवावा लागू नये. ग्रामीण, दुर्गम आणि मागासलेल्या भागांमध्येही आरोग्य सुविधांची पकड मजबूत असली पाहिजे. सर्वांना आरोग्य सुविधेचा अधिकार आहे, तर प्रत्येक व्यक्तीपर्यंत त्या सुविधेची पोहोचही झाली पाहिजे.

- (महाराष्ट्र शासनाद्वारे पुरस्कृत लेखक)
०८२३७४१७०४१

थोडक्यात

## स्वाधार योजनेचे अर्ज करण्यास ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवगार्तील ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही. अशा विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता आदि आवश्यक सुविधा विद्यार्थ्यांना स्वतः उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक ती रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु केलेली आहे. सदर योजनेसाठी सन २०२६-२७ मधील अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली असून आता विद्यार्थ्यांना दिनांक ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज सादर करण्यात येणार आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांचे सन २०२६-२७ मधील अर्ज दि. १५ सप्टेंबर, २०२६, पर्यंत दिलेली मुदत वाढविण्यात यावी याबाबत क्षेत्रीय कार्यालये, विविध संघटना, पालक, विद्यार्थी यांचेकडून मागणी होत असल्यामुळे तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या लाभापासून गरजू विद्यार्थी वंचित राहु नये, यासाठी मागील वर्षात स्वाधार योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना या शैक्षणिक वर्षात ऑनलाईन अर्ज Renew करणेकरीता सदर योजनेअंतर्गत सन २०२६-२७ मधील विद्यार्थ्यांचे अर्ज स्विकारण्याची मुदत आता दिनांक ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत वाढविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. सन २०२६-२७ मध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवगार्तील ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही अशा पात्र लाभार्थ्यांनी सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी तसेच अधिक माहितीकरीता संबंधित जिल्ह्याचे सहाय्य आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाकडे अर्ज सादर करावे असे आवाहन प्रसाद कुळकर्णी, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग नागपूर हे करीत आहे.

## तिडके महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापनाचे धडे



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

येथील श्री नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे 'आपत्ती व्यवस्थापनः मार्गदर्शन व प्रात्यक्षिक' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात रासेयो स्वयंसेवक व विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रत्यक्ष धडे देण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात रामटेक तहसील कार्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या साक्षी घोडाकाडे व शेखर पाटील, प्राचार्य डॉ. शरद पोकळे आणि प्रा. सरिता सिंग यांच्या उपस्थितीत झाली. सुरुवातीला 'आपत्ती म्हणजे काय?' आणि तिचे प्रकार कोणते, या विषयावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. अचानक येणाऱ्या संकटामुळे होणारी हानी टाळण्यासाठी वैयक्तिक व सामाजिक पातळीवर कशी तयारी ठेवावी, यावर साक्षी घोडाकाडे व शेखर पाटील यांनी प्रकाश टाकला.उपक्रमातील प्रमुख आकर्षणे व प्रात्यक्षिके:पूर व जलसंकट,पूरपरिस्थितीत लाईफ जॅकेटचा प्रभावी वापर कसा करावा याचे प्रात्यक्षिक दाखवण्यातआले.

विजेच्या गडगडाटात सुरक्षितताः वीज चमकत असताना स्वतःचा बचाव कसा करावा, याचे मार्गदर्शन केले गेले.प्रथमोपचारः आपत्कालीन स्थितीत रुमाल व स्कार्फचा वापर करून प्रथमोपचार कसा करावा, याचे तंत्र शिकवण्यात आले.प्रथमोपचार पेटीः प्रथमोपचार पेटीतील साहित्याचा योग्य वापर समजावून सांगितला.अग्निशमन यंत्राचा वापरः आग लागल्यास अग्निशमन उपकरणे कशी हाताळावीत, याचे प्रत्यक्ष करून दाखवण्यात आले.या मार्गदर्शन व प्रात्यक्षिकांमुळे उपस्थितांमध्ये आपत्ती व्यवस्थापना विषयी मोठी जागरूकता निर्माण झाली. आपत्कालीन परिस्थितीत न घाबरता धैर्यानेआणि योग्य ज्ञानाचा वापर करून संकटाचा सामना कसा करावा, असा विश्वास या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना मिळाला.कार्यक्रमाचे संचालन रासेयो समन्वयक प्रा. किशोर धांडे यांनी केले, तर आभार प्रा. अंजली बडवाईक यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

## इनर व्हील क्लब ऑफ नागपूरतर्फे तान्हापोळा स्पर्धेचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

इनर व्हील क्लब ऑफ नागपूर, डिस्ट्रिक्ट ३०३च्या अध्यक्षा पूजा सावजी यांच्या नेतृत्वाखाली गांधी नगर येथील लोकमान्ये कॉन्व्हेंट येथे रंगतदार तनापोळा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून



विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, कल्पनाशक्तीला आणि पारंपरिक संस्कृतीच्या जतनाला प्रोत्साहन देण्यात आले. इनर व्हील क्लब ऑफ नागपूरच्या सदस्यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती लाडखेडकर यांनी स्वागत केले. स्पर्धेत ५० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला, तर सुमारे ३०० विद्यार्थी स्पर्धा पाहण्यासाठी आणि सहभागी विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवण्यासाठी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धन, शेती तसेच इतर सामाजिक विषयांवर आधारित विविध संकल्पनांनुसार आपल्या लाकडी बैलांची आकर्षक सजावट केली. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने आपल्या कलागुणांचे प्रदर्शन केले. त्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा कार्यक्रम सर्वांसाठी एक आनंददायी आणि संस्मरणीय अनुभव ठरला.

स्पर्धेतील बक्षिसे क्लबच्या आयएसओ अंशु शुक्ला यांनी प्रायोजित केली. विजेत्यांना तीन मुख्य बक्षिसे आणि दोन उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात आली. तसेच सहभागी प्रत्येक विद्यार्थ्याला प्रोत्साहन म्हणून एक पेन्सिल आणि एक खोडरबर देण्यात आले. या उपक्रमाला कार्यकारी समिती सदस्य आयएसओ अंशु शुक्ला, डॉ. माधुरी वाघ, लक्ष्मी झा तसेच क्लब सदस्या साधना पाटकी यांची उपस्थिती लाभली.

# 'ऊर्जेचा कणा' महावितरण अभियंत्यांचा गौरव

## राष्ट्रउभारणीत योगदान देण्याचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



आधुनिक भारताच्या उभारणीत आणि अखंड वीजपुरवठ्याच्या माध्यमातून देशाची औद्योगिक व सामाजिक प्रगती गतिमान ठेवण्यात अभियंत्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. याच 'ऊर्जेचा कणा' असणाऱ्या अभियंत्यांचा सन्मान करण्यासाठी भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी (दि.१५) साजरा करण्यात आलेल्या अभियंता दिनाचे औचित्य साधून महावितरणच्या नागपूर परिमंडल कार्यालयांतर्गत 'अभियंता दिन' अत्यंत उत्साहात, दिमाखात आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाचा प्रारंभ भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलनाने झाला. या विशेष सोहळ्याला नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक, प्रादेशिक कार्यालयाचे अधीक्षक अभियंता अमित परांजपे, नागपूर ग्रामीण मंडलचे अधीक्षक अभियंता संजय वाकडे, पायाभूत आराखडा विभागाच्या अधीक्षक अभियंता दिपाली माडेलवार, शहर मंडलचे अधीक्षक अभियंता प्रफुल लांडे, चाचणी विभागाचे कार्यकारी अभियंता चंदन तल्लरवार आणि मानवी संसाधन विभागाचे सहायक महाव्यवस्थापक महेश जाधव यांच्यासह प्रादेशिक, परिमंडल, शहर आणि ग्रामीण मंडलातील अभियंते आणि विभाग प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कार्यकारी अभियंता चंदन तल्लरवार यांनी अभियंता दिनाचे औचित्य सांगतानाच राष्ट्र उभारणीतील अभियंत्यांच्या योगदानावर सविस्तर प्रकाश टाकला. भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या आणि माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्याचा आणि विचारांचा दाखला देत त्यांनी उपस्थितांमध्ये काम करण्याची नवी ऊर्जा भरली.

यानंतर मुख्य वक्त्या म्हणून उपस्थित असलेल्या प्रसिद्ध वक्त्या, समुपदेशक आणि जीवनशैली मार्गदर्शक डॉ. वर्तिका पाटील यांनी 'पॉवर स्टेशन ते पर्सनल स्ट्रेंथ' या महत्त्वपूर्ण विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण आणि प्रभावी सत्र घेतले. तंत्रज्ञान व कामाच्या वाढत्या व्यापाबरोबरच २४ तास ताणतणावात काम करणाऱ्या अभियंत्यांनी आपल्या वैयक्तिक आरोग्याकडे कसे लक्ष द्यावे आणि आरोग्य व व्यावसायिक उत्कृष्टता यांचा योग्य मेळ कसा साधावा, याचे सोपे व व्यवहार्य मार्ग त्यांनी यावेळी पटवून दिले.

समारोप सत्रात मार्गदर्शन करताना अधीक्षक अभियंता संजय वाकडे यांनी सांगितले की, महावितरण सध्या मोठ्या परिवर्तनाच्या टप्प्यातून जात असून हा काळ येत्या काळात अधिक उज्ज्वल आणि प्रगतीशील भविष्यासाठी मार्ग मोकळा करेल. कंपनीच्या आयपीओ वाटचालीसंदर्भातही त्यांनी सकारात्मक दृष्टिकोन मांडला. अधीक्षक अभियंता प्रफुल लांडे यांनी सर्व अभियंत्यांना कामाच्या धावपळीत तणावमुक्त राहण्याचे आवाहन केले.

नियमित व्यायाम, जॉगिंग आणि खेळांच्या माध्यमातून शारीरिक तंदुरुस्ती राखल्यास कामाचा ताण कमी होतो, तसेच आपापसात उत्तम समन्वय ठेवून काम केल्यास उत्कृष्ट निकाल मिळतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या सोहळ्यात वर्षभरात उल्लेखनीय व उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अभियंत्यांचा आणि त्यांच्या टीमचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्र देऊन विशेष गौरव करण्यात आला. मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानत अभियंता दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. "आपल्या निष्ठावंत कष्टाने आणि प्रामाणिकपणाने कामाचा असा ठसा उमटवा की ज्यामुळे महावितरणची मान अधिक उंचावेल," असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपकार्यकारी अभियंता स्वाती फटे यांनी, तर मानवी संसाधन विभागाचे व्यवस्थापक कुणाल गजभिये यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## चिमुकल्या श्रीनिकाच्या १० कोटींच्या उपचारासाठी शासन सरसावले, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडून सकारात्मक मदतीचे आश्वासन

### राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या पुढाकाराने शासनस्तरावर हालचालींना वेग

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक :** रामटेक येथील कु. श्रीनिका रोहित माकडे ही अवघी २ वर्षे ११ महिन्यांची चिमुकली असून, तिला रटअ Type-2 (Spinal Muscular Atrophy Type-2) या दुर्मिळ व गंभीर आजाराने ग्रासले आहे. तिच्या उपचारासाठी विशेष इंजेक्शनची आवश्यकता असून, हे इंजेक्शन केवळ अमेरिकास्थित कंपनीकडून उपलब्ध आहे आणि त्याची किंमत सुमारे १० कोटी रुपये आहे. या



गंभीर विषयासंदर्भात दिनांक १५ सप्टेंबर २०२६ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची राज्यमंत्री अँड. आशिष जयस्वाल यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन श्रीनिकाच्या आजाराची तसेच तिच्या उपचारासाठी आवश्यक असलेल्या विशेष इंजेक्शनची संपूर्ण माहिती दिली. श्रीनिकाला जीवनदान मिळण्यासाठी हे इंजेक्शन तातडीने उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक असल्याचे यावेळी उपमुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले. या गंभीर विषयाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सकारात्मक दखल घेत, श्रीनिकाच्या उपचारासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला. तसेच संबंधित यंत्रणांच्या माध्यमातून या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यासाठी सहकार्य करण्याची भूमिका त्यांनी व्यक्त केली.

## शाश्वत विकासासाठी नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार गरजेचा : संभाजी माने

### इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सतर्फे ५९वा अभियंता दिन उत्साहात साजरा




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शाश्वत विकासाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी अभियांत्रिकी क्षेत्राने नव्या आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यासोबतच संशोधन व विकासाला अधिक प्राधान्य देणे गरजेचे आहे. रस्ते बांधकाम, नगररचना आणि पायाभूत सुविधा विकासामध्ये पर्यावरणपूरक तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर झाला पाहिजे, असे प्रतिपादन सार्वजनिक बांधकाम विभागाचे (पीडब्ल्यूडी) मुख्य अभियंता संभाजी माने यांनी केले. द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), नागपूर लोकल सेंटरतर्फे मंगळवारी सभागृहात ५९वा अभियंता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यंदाच्या अभियंता दिनाची संकल्पना 'शाश्वत आणि तंत्रज्ञानाच्या दृष्टीने आत्मनिर्भर भारतासाठी अभियांत्रिकीतील उत्कृष्टता' अशी होती. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना संभाजी माने यांनी शाश्वत विकासामध्ये अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानाच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. भारताची तांत्रिक आत्मनिर्भरता मजबूत करण्यासाठी अभियंत्यांनी नवोन्मेष, संशोधन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार यावर भर देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. नगररचना आणि पायाभूत सुविधांविषयी बोलताना माने म्हणाले की, केवळ सुमारे १०० मिमी पाऊस झाल्यानंतरही शहरातील अनेक भागांमध्ये पाणी साचते. त्यामुळे पायाभूत सुविधांची सर्वंकष रचना आणि शास्त्रीय नियोजनाची आवश्यकता अधोरेखित होते. विविध शासकीय यंत्रणा, अभियंते आणि नियोजन संस्थांमधील संवादातील दरी दूर करणेही आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नागपूर लोकल सेंटरचे अध्यक्ष डॉ. संदीप शिरखेडकर यांनी स्वागतपर भाषण केले. तसेच संस्थेतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा त्यांनी सादर केला. सुमारे चार हजार अभियंते संस्थेचे सदस्य असून, देशाच्या विकासात संस्था महत्त्वपूर्ण योगदान देत असल्याचे त्यांनी सांगितले. वॉल्सन वर्गीस यांनी भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जीवनकायार्चा परिचय करून दिला. राजेश लांबे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. महेश शुक्ला यांनी सूत्रसंचालन केले. मानद सचिव अभियंता जयंत जोशी, प्रकाश कुलकर्णी आणि श्रीकांत डोईफोडे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. जयंत जोशी यांनी आभार मानले. संस्थेचे पदाधिकारी, अभियंते आणि मोठ्या संख्येने सदस्य या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# दारु विक्रेत्याची पोलिस कर्मचाऱ्याला अमानुष मारहाण, गंभीर जखमा

**सावनेर पोलीस विभागात खळबळ**

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सावनेर पोलीस स्टेशन अंतर्गत आरोपीच्या शोध कामी गेलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांला अवैध दारु विक्रेत्याने प्लास्टिक च्या पाईप ने जबर मारहाण करत गंभीरपणे जखमी केल्या ची घटना उघडकीस आल्याने एकच खळबळ उडाली.

मिळालेल्या माहितीनुसार १५ सप्टेंबर रोजी दाखल असलेला अप क्र ९३३/२६ कलम 65 e 83 मदाका चा गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्यातील आरोपी जॉय परांजपे राह. वाघोडा यास दारूबंदी कायद्यान्वये कार्यवाही करण्यात आली असून त्यास गुन्ह्याचे संबंधाने विचारपूस केली असता त्यांनी सदरचा दारूचा धंदा हा अमन धनोले, रा. सावनेर याचा असल्याचे सांगितल्याने आरोपी जॉय परांजपे तसेच फरार आरोपी अमन धनोले याच्यावर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून त्या अनुषंगाने आज रोजी पोहवा १९३९ हे आरोपीचे शोध कामी अमन धनोले यांच्या राहते घरी गेले असता आरोपी अमन धनोले यास गुन्ह्यासंबंधीने पोस्टेला सूचना पत्र देण्यासंबंधाने बोलचाल करीत असताना आरोपी अमन धनोले याने शिवीगाळ करून एका मोठ्या प्लास्टिक जाड पाईपाने मारहाण करायला सुरुवात केली. तेवढ्यातच अमन धनोले याची आजी ही पोलिसाला मारहाण



करू नकोस असे बोलून मध्यस्थी करत असताना तो प्लास्टिक पाईप त्याच्या आजीच्या हातावर सुद्धा लागला होता असे सांगितले. सदर मारहाणीमध्ये पोलिस कर्मचाऱ्याच्या डाव्या हाताच्या बोटाला गंभीर जखम झाली आहे.

सदर घटनेची माहिती सावनेर पोलीस स्टेशनच्या ठाणेदार यांना देत घडलेल्या प्रकाराची लेखी तक्रार केली असता भारतीय न्याय संहिता २०२३ कलम १३२,२२१, २६९, 351 (२) नुसार गुन्हा नोंदवून पुढील तपास सावनेर पोलीस करत आहे.

सदर घटनेने एक बाब तर स्पष्ट होत आहे की, ग्रामीण पोलीस अधिक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण मधे गुन्हेगारी व अवैध व्यवसायाचा आलेख जरी कमी दाखवत असतील तरी मात्र अवैध दारु विक्रेत्यांची हिंमत थेट पोलीस कर्मचाऱ्यांना मारहाण करण्यापर्यंत पोहचली हे सुध्दा नाकारता येत नाही.

# चोरट्यांनी फोडले सावनेर येथील गुरूकुल आयटीआय, ६ लाखाचे प्रशिक्षण साहित्य लंपास

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सावनेर पोलीस स्टेशन येथील धापेवाडा येथे प्राचार्य रवि फुलझेले यांनी त्यांच्या गुरुकुल आयटीआय संस्था नीलगाव पंधान रोड, धापेवाडा, तहसील कळमेश्वर, जि. नागपूर येथे असून ते सावनेर पोलीस स्टेशनच्या हद्दीत येते। दिनांक १२ सेप्टेम्बर टे १४ सप्टेंबर २०२६ पर्यंत संस्थाला सुटी असल्याने कोणीतरी अज्ञात व्यक्तींनी गुरुकुल आय. टी. आय.मध्ये प्रवेश करून चोरी केली असल्याचे निदर्शनास आले.

दिनांक १५ सप्टेंबर २०२६ रोजी




ते आय.टी.आय पोहचले असता अनेक ठिकाणचे कुलूपे व दरवाजे तुटलेले दिसले. त्यानंतर मी वर्कशॉपमध्ये जाऊन पाहणी केली असता विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी वापरण्यात येणारे अनेक मोटर्स चोरीस गेलेले आढळले त्यानंतर स्टोअर रूम उघडून पाहिली असता तेथील विविध साहित्य व सामानही चोरीस गेलेले आढळले. या घटनेची माहिती महेश पवार सर यांनी त्यांना दिली, तसेच संचालकांना फोन केला असता त्यांचा फोन लागला नाही. नंतर त्यांच्या संपर्क झाल्यानंतर त्यांनी तक्रार नोंदविण्यास सांगितले.

या चोरीमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी वापरण्यात येणाऱ्या मोटर्स, स्टोअर रूममधील साहित्य, तसेच ऑफिसच्या दरवाजांचे नुकसान वगैरे धरून अंदाजे ६ लाखांपेक्षा अधिक किमतीचा माल चोरीस गेला आहे. तसेच ऑफिसमध्ये ठेवलेली लेदरची बॅग आणि त्यातील पासबुक व चेकबुकसुद्धा चोरीस गेले आहेत, ज्यामध्ये जय भारत नवयुवक संस्था, गुरुकुल आय.टी.आय. व साईनारा प्रायव्हेट लिमिटेड यांचे चेक असल्याचे दिसते. तसेच एक गॅस सिलिंडरदेखील चोरीस गेलेला आहे. चोरीस गेलेले सामानाची सविस्तर सूची व उपलब्ध बिलं तक्रारीला जोडत आहे.

प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन घटनास्थळी पाहणी करून, पंचनामा व आवश्यक तपास करून अज्ञात आरोपींविरुद्ध एफ.आय.आर. नोंदवून योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, ही विनंती तक्रारीतुन करण्यात आली आहे सदर घटनेत चोरट्यांनी १२ प्यानलच्या १२ मोटार ७ एच. पी.,स्पॅनर सेट २ नग. गोटी, ३ पॉइंट स्टार्टर, एच.पी. गॅस सिलेंडर., इतर पेपर फाइल असे जवळपास सहा लाखापेक्षा अधिकचा मुद्देमाल लंपास केल्याचे तक्रारीत नमुद आहे.सावनेर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा नोंदवून पुढील तपास करीत आहे.

### सावनेर पोलीस स्टेशन अंतर्गत वाढत्या चोरी चिंताजनक

सावनेर पोलीस स्टेशन अंतर्गत चोरीच्या घटनेत वाढ होत असुन नागरिकांना आपल्या मुद्देमालाच्या सुरक्षीतते बाबत आता चिंता होऊ लागली आहे. तर वाढत्या चोरीच्या घटनेमुळे स्थानिक पोलीसांच्या रात्रकालीन गस्तीवरही प्रश्नचिन्ह निर्माण होत असुन सावनेर ठाण्याचे सुत्र नविन ठाणेदारांनी स्वीकारले आहे तेव्हापासून बाढत असलेल्या गुन्हेगारीच्या आलेखावरुन ठाणेदारां चोरटे,अवैध व्यवसायीकांवर वचक नसल्याचे दिसून येत आहे.